हिंदु धर्म प्रसिद्धीकरण.

जॉन उइल्सन कृत्त

EXPOSURE

OF THE

HINDOO RELIGION

BY THE

REV. JOHN WILSON.

मुंबई मध्यें छापली

ख्रीस्तीशक

१८३२

R. Prera Lithog.r

हिंदु धर्म प्रसिद्धीकरण.

कोणी एक मोरभट्टनामक याने दुसर्या कांहीं ब्राह्मणा
च्या सहायानें एक लहान महाराष्ट्र भाषेंत ग्रंथ लिहून-
छापिवला आणि त्याचें उत्तर मजपाशीं मागितलें. याकरि
तां मीं तो एकाग्रतेनें वाचून त्याच्या मौढतेमुळें फार उल्हा
सित होऊन स्वमत प्रतिपादक तदुत्तर लिहितों. परंतु-
त्या ग्रंथांत उत्पन्न करणाऱ्यानें बहुत चुका केल्या आहेत
असें मला दिसलें. त्या एथें प्रगट करितों. अहो वाचणारा
नों ज्या वर्णन करणार गोष्टी त्या त्रैलोक्याचे उत्पादक संबं
धीं आणि माणसांचा उद्धार होण्याविषयीं आहेत. यारिका
मपणाच्या नव्हत. सर्व लाभाच्याच आहेत. म्हणून फा
र नम्र होऊन सत्यत्वाची इच्छा धरून एकाग्रमनें वाचा आ
णि परमेश्वरापाशीं उत्तम बुद्धि मागून यांचा विचार करा.
जें प्रसिद्ध त्याजवर शंकारूप आच्छादन घालिलां जीं प्र
माणें दर्शित आहेत तीं स्थीर चित्तें पाहा आणि विवेकानें
न्याय ठरवा. जो आम्हास व सर्वांस पाहाणारा ईश्वर तो
सहाय करो.

हिंदुधर्मस्थापना ग्रंथकारानें असें लिहिलें कीं "स
र्व मनुष्यें आपल्या सूक्ष्म बुद्धीनें विचार करून धर्माचें आ

चरणक

करित असतात". परंतु मला असें दिसतें कीं गोष्ट अशी नव्हे. ह्या देशीं बहुतकरून लोक धर्माविषयीं कांहींच शोध नकरितां आईबाप गुरू यांच्या वचनावर विश्वास ठेऊन धर्मप्रमाणाविषयीं नझटतां आचरण करितात. याचें कारण मोरभट्टाच्या ग्रंथीं मिळेल. तें एथें उल्लेखन करितों. "सर्व मनुष्यें स्वभावेंकरून उद्धत पापी आणि अज्ञानी आहेत" असें असतां जर मिथ्या धर्मावर निश्चय होऊन या धर्में करूनच आह्मी मुक्त होऊं याप्रमाणें वागून खऱ्या धर्मांत शिरायास नइच्छितील तर आश्चर्य कां मानावें? त्यांनी सर्वप्रकारें यथास्थित विचार केला असतां निश्चयें खरेमार्गाकडेच फिरतील. आणि जर सर्व विचार सोडून अज्ञानदशा अवलंबून ज्ञानाचा शोध करित नाहींत तर त्यांला खरें कसें काय मिळेल?

भट्टानें लिहिलें कीं "धर्म ह्मणजे काय आणि तो सत्य मिथ्या कशावरून हेंही समजेना असें होत चाललें आहे. अशा संकटसमयीं जर इतर धर्मांचे लोक जें लिहून प्रसिद्ध करितात त्याचें उत्तर नदेतां उगीच राहिलें तर कांहीं कांदिवशीं अनर्थ होईल." त्यानें असें मत लिहून प्रतिपादन केलें यामुळें त्याजवर आह्मी दोषारोप करितों असें नाहीं. तर दोन मतें प्रसिद्ध झाल्याव

र

र. साम्यता करून न्याय ठरवायास लोक शक्तिमान होतील.

हिंदुधर्मोपद्रवाचें कारण मोरभट्टाचे ग्रंथीं असें ध्वनित होतें कीं "उत्तरोत्तर हिंदुलोकांत विद्या कमी होत चालली आहे" याजवरून मी असें ह्मणतों कीं बहुत लोकांचा निश्चय झाला कीं जर खऱ्याविद्येचा प्रस्तार होईल तर निश्चय हिंदुधर्म लयास जाईल. खऱ्या विद्येच्या व पुराणाच्या सिद्धांतास परस्परें फार विपरीत तत्व आहे. तें असें कीं. पृथ्वी गोळाकार असतां पुराणांत पुष्कर पत्रासारिखी व कांहीं पटांगणासारखी वर्णिली आहे. विद्येमध्यें तिचें वर्णन आधांत्रीं व पुराणांत कूर्मपृष्ठीं व कांहीं पुराणांत अनंतावर पृथ्वी आहे असें सांगितलें आहे. तिचा घेर सुमारें १२४३४ बाराहजार चारशें चौतीस कोस असतां पुराणांत ५०००००००० पन्नास कोटी योजनें व्यास आहे असें वर्णिलें. सूर्यापासून पृथ्वी ४७०००००० चार कोटी सत्तर लक्ष कोस असतां पुराणीं एक लक्ष योजनें दूर आहे. चंद्रापासून पृथ्वी १२०००० एक लक्ष वीस हजार कोस असतां पुराणाप्रमाणें दोनलक्ष योजनें दूर आहे. अशीं वैपरित्यें आणखीं ब्रह्मांडाविषयीं भ्रांतिकर गोष्टी पुराणांतरीं बहुत आहेत. त्या किती वर्णन करूं? वेदांतही मागल्यासारख्या पुष्कळ चुका आहेत उदाहरण चंद्रापासून पाऊस येतो!

त

तस्मात् जें देव निर्मित पुस्तक त्यांत अशा चुका पडतील कीं काय? यांवरून सांप्रतकाळीं अनुपयुक्त कुत्सीत हिंदुधर्म दिसूं लागला. यागोष्टीविषयीं विशेषेंकरून कलकत्यामध्यें प्रमाण सांपडेल. तिकडील कांहीं विद्वान व श्रीमंत लोक हिंदुधर्म सोडावयास मुहूर्त पाहतात. बाबू महादेव चंद्रतलक यानें वर्तमान कागदामध्यें असें छापविलें कीं "इहलोकांतील पदार्थांमधून सर्वांपेक्षां घाणेरडा हिंदुधर्म असें मला व माझ्येमित्रांस दिसतें वाईट पण वर्धनाविषयीं सर्वांपेक्षां आमच्या मतें आदिकारण हिंदुधर्म होय. पापची वृद्धि करण्यासाठीं जी सर्वांपेक्षां चांगली योजना ती आमच्या दृष्टींत हिंदुधर्म आहे. आणि लोकांचें सुख कल्याण समाधान यांचें ध्वंसक सर्वांपेक्षां श्रेष्ठ हिंदुधर्म आहे"

जें प्रथम दूषण निवारण करायास मोरभट्ट दांडेकर प्रयत्न करितो तें मूर्तिपूजन आहे. ह्याविषयीं पुर्तेपणीं विचार करणें तो पुढें करूं. परंतु ब्रह्मा विष्णु शिव यांविषयीं त्याचे पुस्तकाच्या शेवटीं ज्यागोष्टी लिहिल्या त्यांचा प्रथम शोध करितों. त्या हिंदु धर्मास मुळकारण आहेत. जर विवेकानें उत्तर प्रतिउत्तर पडेलतर त्याविषयीं न्याय ठरविला पाहिजे.

बहुतकरून हिंदुलोक मुख्य देव भगवान् एकच आहे असें कबूल करितात. आणि मोरभट्ट दांडेकरानेंही ह्याविषयीं व याच्या गुणाविषयीं बहुत गोष्टी लिहिलेल्या आहेत. हा देव "निराकार" "सर्वशक्ति" "सर्वज्ञ" "सच्चिदानंद" "कृपाळू" "अनंत ईश्वर" असें म्हणतो. याविषयीं त्याचें व माझें एकच मत. परंतु भगवान् हिंदु ब्रह्म आहे असें कोण म्हणेल? हिंदुशास्त्रांत देवाशिवाय दुसर्या पदार्थांस ब्रह्म म्हटलें आहे. आणि वेदांत वायु जीव अन्न चाकर दुष्टलोक इत्यादिकांस ब्रह्म असें म्हटलें आहे. कोणे एके पुराणामध्यें गरुडास ब्रह्म असें म्हणून चराचरपति असें म्हटलें आहे. गीतेमध्यें असा श्लोक आहे.

ममयोनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भंदधाम्यहं ॥

अर्थ — महद्ब्रह्म जें माझी योनी त्याच्याठायीं मी गर्भधारण करितों. शास्त्रानें व भट्टानें "निर्गुण" ब्रह्म असें म्हटलें आहेतर त्याला सर्व चांगले गुण आहेत असें कां म्हणावें?

मोरभट्टानें असें लिहिलें आहे कीं ज्यास ब्रह्म असें संस्कृत भाषेंत नाम आहे तो एक देव. जेव्हां या ब्रह्मास सृष्टि करण्याची इच्छा होत्ये तेव्हां ब्रह्मा पालनसमयीं विष्णु आणि संहारसमयीं रुद्र अशीं नामें होतात. आणि

"जेव्हां त्यानें अवतार धरिला तेव्हां आईबाप आहेत"
या बोलण्यांत मला फार अडचणी दिसतात याचें निवेदन
संक्षेपानें करितों. मत्स्य पुराणामध्यें असा श्लोक आहे कीं

गुणेभ्यः क्षोभ्यमाणेभ्य स्त्रयोदेवा विजज्ञिरे ॥
एकमूर्तिस्त्रयोभागा ब्रह्माविष्णु महेश्वराः ॥

याचा अर्थ असा आहे कीं तीन गुण जे आहेत त्यांस क्षोभ
झाला यास्तव त्यांपासून तीन देव उत्पन्न झाले. त्या ती-
न भागांची एकच मूर्ति "ब्रह्मा" "विष्णु महेश्वर". या तीत
यावर अलीकडे मुंबईत कोणी एक ख्रीस्ती शिष्यानें सांगि
तलें कीं "देव निर्गुण आहे असें असतां त्यापासून सत्व
रज तम हे गुण कसे उत्पन्न झाले? याविषयीं फार संशय
आहे. आणि या बोलण्यावरून तीन अडचणी दिसता
त. प्रथम अडचण देव निर्गुण असें ह्मणतां याच बोल
ण्यानें देवाचा अपमान होतो. दुसरी अडचण त्याला ज
र शक्तिनाहीं तर हें सर्व कसें उत्पन्न झालें. तिसरी अड
चण रज तम हे गुण देवाला लावणें हें फार अनुचित
तें माझानें बोलवत नाहीं." या गोष्टीवरून असें दि
सतें कीं मत्स्यपुराणांतून मागील काढलेल्या वर्णनाम
ध्यें फार भ्रांति आहेत. आह्मी अशा आश्चर्यांचें पर्य
वसान कोठे करावें? दुसर्या ठिकाणांतील वर्णन ही

बरोबर लागत नाहीं. कांहीं पुराणामध्यें सांगितलें आ-
हे कीं आदिशक्तिपासून ब्रह्मा विष्णु शिव आहेत आणि
ती ह्या तीन देवांस प्रसवली आणि ती ह्यांसच मोहि
त होऊन नवरे मानिले. भागवत इत्यादि पुराणाम-
ध्यें असें सांगितलें आहे कीं विष्णूच्या नाभिकमळापासून
ब्रह्मा उत्पन्न झाला. कांहीं पुराणामध्यें लिहिलें आहे कीं
आदिशक्तिपासून एक बीज उत्पन्न झालें आणि शिवजी
विष्णूचा पिता याचा त्या बीजापासून प्रारंभ झाला. ज्या
मत्स्यपुराणापासून मागें एक गोष्ट काढलेली आहे त्यां
त ही विपरीत गोष्ट प्रगट झाली आहे कीं ब्रह्म्याला शि-
वानें उत्पन्न केलें. श्लोक.

ततोसृजद्वामदेवं त्रिशूलवरधारिणं ॥

ह्मणजे त्यानंतर वामदेवजो त्रिशूल धारक त्याला ब्रह्म्या
नें उत्पन्न केलें. नारदीय पुराणामध्यें असें वर्णन आहे कीं
नारायणाच्या दक्षिण कुक्षिपासून ब्रह्मदेव करिहृय मध्यापासून शि
व वामकुक्षिपासून विष्णु असे तीन निर्माण झाले. लिंगपुराणाम
ध्यें असें सांगितलें कीं ब्रह्मांडापासून रूपधारी शिव निर्माण होऊन
त्याच्या वामकटीपासून विष्णु लक्ष्मी व दक्षिण कटिपासून ब्रह्मास
रस्वति अशीं चार निर्माण झालीं. लिंगपुराणामध्यें पुनः
असें वर्णिलें आहे कीं ब्रह्म्याच्या हस्तें सृष्टि उत्पन्न होइ

ना त्यासमयीं तो रुदन करूं लागला तदनंतर त्याच्या श्वासोच्छ्वासापासून शिव उत्पन्न झाला. त्यालाही उत्पन्न करण्याचें काम होइना. तेव्हां पुनः आपानें सृष्टि सर्जनास यत्न केला. मार्कंडेय पुराणीं असें लिहिलें कीं महालक्ष्मीपासून ब्रह्मा व महाकालीपासून शिव महासरस्वतीपासून विष्णु असे तीन झाले. वराहपुराणामध्यें असें आहे कीं ब्रह्मा विष्णु शिव यांपासून एक शक्ति उत्पन्न झाली आणि तिचे तीन विभाग होऊन त्यांपासून लक्ष्मी सरस्वती कालि अशा तीन उत्पन्न झाल्या. अशीं सर्व कथनें परस्पर विपरीत आहेत. यांत आधार कोठें मिळेल? जर भगवान प्रकाश उत्पन्न करण्यासाठीं आणि खरा मार्ग प्रसिद्ध होण्यासाठीं काहीं ग्रंथ लाऊन देईल तर यांस अशी असंभावना पडेल कीं काय?

हिंदु शास्त्रांत ब्रह्मा विष्णु शिव यांच्या उत्पत्तिविषयक ज्या वर्णित गोष्टी त्या फार भ्रमदायक आहेत. आणखी यांच्या महात्म्यपदवीव सेवा यांविषयीं ज्या आहेत त्याही भ्रमकारक आहेत. सांप्रतकाळीं ब्रह्माविषयीं काहीं वक्तव्य नाहीं कांकीं पुढील सांगितल्या कारणामुळें बहुतकरून हिंदु लोकांत याचें भजन होत नाहीं. परंतु विष्णूचें अथवा शिवाचें पद काय आहे हें कोणास ठाऊक? यांविषयीं वे

द

दें शास्त्रें पुराणें यांच्या ग्रंथकारांचीं मतें परस्परें अगदीं विपरीत आहेत. या श्लोकावरून प्रमाण वेदांत असें लिहिलें आहे. कीं

सर्वव्यापीस भगवान्तस्मात्सर्वगतः शिवः ॥

ह्मणजे — जो सर्वव्यापी तो भगवान यास्तव सर्वगति शिव भगवान आहे. भागवतामध्यें असें वाक्य वेदार्थास वांकडें आहे कीं.

भवव्रत धरायेच येच तानुसमनुव्रताः ॥
पाषांडिनस्ते भवंतु सच्छास्त्र परिपंथिनः ॥
मुमुक्षवो घोररूपान्हित्वा भूतपतीनथ
नारायणकलाः शांता भजंतिह्यनुसूयवः ॥

ह्मणजे — शिवव्रत आचरितात आणि त्यांस जे अनुकूल होतात त्यांस पाखंडी व खरें शास्त्र प्रतिकूल असें ह्मणावें. मोक्षाची इच्छा धरणारे जे ते घोररूप भूतपति यास वर्जून. नारायणाकडे चित्त लावून शांत व ईर्षारहित होऊन त्याला भजतात. पद्मपुराणावरून त्या शिवाला बहुत थोरपणा येतो याप्रमाणें.

विष्णुदर्शनमात्रेण शिवद्रोहः प्रजायते
शिवद्रोहान्न संदेहो नरकं याति दारुणं ॥
तस्मान्न विष्णुनामापी न वक्तंव्यं कदाचन ॥

वि

[illegible] Oriental MSS. Library, [illegible] Madras.

विष्णूचें दर्शन घेतलें असतां शिवप्रतिकूल होतो. शिवप्रतिकूळ झाला ह्मणजे घोरनरक निःसंशय प्राप्त होतो तस्मात् विष्णूचें नाम देखील कधीं घेऊंनये ॥ पद्मपुराणामध्यें असा विपरीत श्लोक आहे कीं.

यस्तुनारायणंदेवंब्रह्मरुद्रादिदैवतैः
सममन्येनिरीक्षेत सपाषांडीभवेत्सदा ॥ ४ ॥
किमत्रबहुनोक्तेन ब्राह्मणायेप्यवैष्णवाः
नस्पृष्टव्यानवक्तव्यानद्रष्टव्याः कदाचन ॥ ५ ॥

ह्मणजे — ब्रह्मारुद्रादि दुसरे देवनारायणसमान आहेत असें जे ह्मणतात ते सर्वकाळ पाखंडी आहेत ॥ ४ ॥ याविषयीं फार काय बोलावें ? जो ब्राह्मण वैष्णव नव्हे त्याला कधींहि शिवूंनये बोलूंनये व पाहूंनये ॥ महादेव असें नाम वेदामध्यें शिवाला दिल्हें आहें परंतु काहीं दुसर्या ठिकाणीं विष्णूचें स्तवन याप्रमाणें केलें आहे कीं.

योन्यदेवंपरत्वेन वदंतिज्ञानमोहिताः
नारायणजगन्नाथात्तेवैपाषांडिनस्मृताः ॥ ३

नारायण जगन्नाथ यांहून दुसरा देव मोठा आहे असें जे ह्मणतात ते अज्ञान मोहित आहेत त्यांस पाखंडी ह्मणतात ॥ काहीं ठिकाणामध्यें असा श्लोक आहे कीं.

एषदेवोमहादेवोविज्ञेयस्तुमहेश्वरः

न

नतस्मात्परमंकिंचित्पदंसमधिगम्यते ॥

महादेवास महेश्वर असें जाणावें त्यापेक्षां कांहीं मोठें आहे असें समजूंनये. कांहीं दुसऱ्या ठिकाणामध्यें असा विपरीत श्लोक आहे कीं.

वासुदेवंपरित्यज्ययोन्यदेवमुपासते
तृषितोजान्हवीतीरेकूपंखनतिदुर्मतिः ॥

ह्मणजे कीं जो कोणी वासुदेवाची वंचना करून अन्यदेवाची उपासना करितो तो मूर्ख मनुष्य. तृषातूर होऊन गंगातिरीं कूप खणतो त्यासारिखा आहे. गोष्टी अशा असतां बहुत लिहायाचें कारण नाहीं. परस्परांची विरुद्ध वर्णनें काढलीं असतां हा ग्रंथ पुराणासारिखा मोठा होईल.

ब्रह्मा विष्णु शिव यांची पदवी व उत्पत्तियाविषयीं अशा हिंदुशास्त्रांत भ्रांतिकर गोष्टी आहेत तशाच त्यांचे गुण व यश यांविषयीं आहेत. मूर्ख अशक्त हलके गर्विष्ट मत्सरी व कलहकारी असे हे तीन कल्पित देव पुष्कळ ठिकाणीं प्रसिद्ध आहेत. दुष्ट लोकांसारिखी व रानपशूंसारिखी एकमेकांशीं लढाई करितात. कीं आपल्या आसनावर बसावें ह्मणून नास्तिकपण वाढवितात व नानाप्रकारचीं वाईटसाधनें करितात. निर्लज्जमन करून भोगी व व्यभिचारी होतात. मिथ्यावादी शठ चोर मद्यपी असें त्याचें वर्णन आहे. जे त्यां

नीं

नीं पापनकेलें असें कोणतेंही नाहीं.

यात्रिमूर्ति समजून यांचें दुष्टपण व अयोग्यता अश-
क्तता पुढील गोष्टींवरून संक्षेपानें ध्यानांत येतील. अत्रिऋ
षीची स्त्री अनुसूया ती सर्वांत श्रेष्ठ पतिव्रता होती तिच्या प
तिव्रतनेम भंगकरावयास ब्रह्मा विष्णु शिव याचकस्वरूप
धारणकरून तिच्या घरीं भिक्षामागावयास आले. तेव्हां ती
कांहीं भिक्षाघेऊन त्यांजवळ आली. तिलापाहून याचक बो
लले कीं आह्मी अशी भिक्षा घेणार नाहीं जर तूं नग्नहोऊन
आह्मास भोजन घालशील तर राहूं नाहींतर असेंच जाऊं.
तिणें भ्रताराची आज्ञा घेऊन त्यांच्या भाषणास अनुमोद
न देऊन पाकसिद्धि केली. मग याचकांस पाचारून हस्ता
मध्यें पाणी घेऊन त्यांच्या अंगावर शिंपून त्याना लहान बा
ळकें केलीं. नंतर त्यानी भोजन संपादिलें. परंतु लज्जा मोठी
प्राप्त झाली. त्याना पाळण्यांत घालून निजविले. हें वर्तमा
न नारदानें पाहून त्यांच्या स्त्रियांस जाऊन निवेदन केलें.
तेव्हां त्या भयाभित होऊन अनुसूयेच्या द्वारीं येऊन प-
तिभिक्षा मागितली. तेव्हां अनुसूया बोलली कीं तुह्मी आ-
पआपले भ्रतार ओळखून घ्या. त्या जेव्हां अवलोकन करूं
लागल्या तेव्हां तिन्ही एकसारखीं बाळकें दिसूं लागलीं. मग
अनुसूयेस प्रार्थून बोलिल्या कीं आमचे पती ओळखून द्या.

ति

तिणें त्यांची त्रिगुणात्मक एकमूर्ति करून दत्तात्रय नाम
ठेविलें आणि तिघींचे भ्रतार दिल्हे.—ज्याकाळीं देवांनी
क्षीरसमुद्र मंथन केलें त्यापासून लक्ष्मी निर्माण झाली.
तिलापाहून ब्रह्मा विष्णु शिव तिघेही मोहित होऊन ति
च्या प्राप्तिसाठीं परस्पर कलहास प्रवृत्त झाले.—दिवो
दास तपस्या करित असतां तीपासून देवांस भीति हो-
ऊन तपस्या भंगकरायास गणपति करीव जगांत नास्ति
कता वाढवून पापवृद्धिकेली!— शुंभ निशुंभासूर महा
बलवान होऊन सर्वदेवांचें राज्य हरण करिते झाले!—
राज्य राजेश्वरी आसनावर बसून त्या आसनाचे तीन पा
पाय ब्रह्मा विष्णु शिव यांच्या मस्तकावर ठेविती असें
सांगितलें आहे!

यात्रिमूर्ति एकरूपें पाहतां इतके दोष यावर संभ
वतात. यांलाच पृथक्त्वें पाहिलें असतां किती दोषारोप
होतील यांची गणनाही नाहीं. या गोष्टीचें प्रमाण होण्या
साठीं पुढें हिंदुशास्त्रांतून काढलेल्या गोष्टी लिहिल्या आ
हेत! त्या वाचून पाहाव्या ह्मणजे कळेल. याविषयीं ल-
ज्जा नहोती तर फार वर्णिल्या असत्या.

भट्टानें असें लिहिलें आहे कीं "ब्रह्मास सृष्टी कर
ण्याची इच्छा होत्ये तेव्हां ब्रह्मा". याब्रह्म्याचें वर्णन असें

आ

आहे तें पहावें. दुसरे देव गंधर्व किन्नर यक्षराक्षस यां-
सारखा तीमद्यपी असे. कोणें समयीं उन्मत्त होऊन आ
पल्या कन्येला भोगायाविषयीं उद्युक्त झाला. याकुकर्मा
मुळें त्याचें एकशीर छेदिलें. परंतु पद्मपुराणामध्यें ब्रह्म्या
नें शिवास नमस्कार न केला यामुळें वामकरांगुष्ठानें त्या-
चें शीर छेदिलें.—मत्स्यपुराणामध्यें असें सांगितलें आहे
कीं ब्रह्मा देवांच्या शताब्दपर्यंत स्वपुत्रीशीं रतला.—शि
व पार्वतीच्या विवाहकाळीं ब्रह्मा याजक होता त्यानें तिला
पाहून त्याचें रेतक्षाळण झालें.—वृंदावनापासून त्यानें
गोप वत्सें चोरून नेलीं!-कांहीं पुराणामध्यें सांगितलें
आहे कीं त्याच्या पापामुळें शाप झाला. स्कंदपुराणीं
अशी गोष्ट लिहिली आहे कीं ऋषीच्या शापानें शिवाचें लिं
गपतन झालें. आणि तें वर्द्धमान होऊन आकाश पाताळ
भरलें तें अवलोकन करावयास ब्रह्मा विष्णु आदिकरून
इंद्रादि देव आले. आणि आश्चर्य करून बोलूंलागले कीं
याचा अंत कोणास लागेल. अंत पाहावयास विष्णु पाता
ळीं गेला आणि ब्रह्मा स्वर्गीस गेला. परंतु शोध लागला
नाहीं. तथापि ब्रह्मदेव लज्जायमान होऊन कामधेनू व
केतकी वृक्ष यांस खोटे साक्षी सिद्धकरून मला अंत ला-
गला म्हणून समस्त देवांस खिवेळ सांगितलें. तें सर्वांनीं
मि

मिथ्या जाणून "तुझी याजगतीवर कोणी पूजा करणार ना
हीं" असा शाप दिल्हा. याजकरितां हिंदुलोक त्याचें देवाल-
य बांधितनाहींत आणि लज्जा धरून त्याची पूजाही करि
तनाहींत. भट्टानें असें विचारिलें कीं "आरंभींचा पुरुष ब्र
ह्मा त्याच्या शब्दास अप्रमाण असें कोण म्हणेल." उत्तर
सिद्ध आहे. जे सत्यमानितात ते केवळ अप्रमाण म्हणणा
र नाहींत परंतु तुच्छ करितील. जो खोटीसाक्ष देतो त्या-
जवर कोण विश्वास ठेवील.

आमच्या वाद्याच्या बोलण्याप्रमाणें "ब्रह्मच पालनस
मयीं विष्णु" होतो. त्याजवरही बहुत पापें भासतात. लक्ष्मी
त्यास कशी प्राप्त झाली हें सर्वांस ठाऊकच आहे. समुद्र
मंथन केलें तेव्हां एकेसमयीं अकाबाई व लक्ष्मी नि
घाल्या. लक्ष्मी तरूण सुंदर पाहून तिजशीं लग्नकरा-
वें अशी विष्णूला इच्छा झाली. परंतु जेष्ठीचें लग्न न
होतां कनिष्ठेचें नकरावें याजकरितां उद्दालक ऋषीला
फसवून त्याकरीव अकाबाईशीं विवाहकरविला. नं
तर लक्ष्मीशीं आपण विवाहकेला.—विष्णुपुराणामध्यें
असें सांगितलें आहे कीं तुळसीनें विष्णूशीं विवाह क
रावा यासाठीं बहुत तपश्चर्या करून विष्णूस विनंती के
ली. तेव्हां लक्ष्मीनें निषेधिलें असतां तिलावचन देऊ
न

न तूं वृक्षरूप झालीस ह्मणजे मी शाळग्राम शिळा होऊन तुजपाशीं सर्वकाळ राहेन.— विष्णूनें जालंधर दैत्याचें रूप धारण करून त्याची स्त्री वृंदाईला फसविलें. आणखी दुसऱ्या एक पतिव्रतेला फसविण्यासाठीं वृक्षाचें रूप धरिलें. अमृत विभाग समयीं दैत्यांस जें वचन दिल्हें तें नकरितां त्यांस मोहित करण्यासाठीं लज्जा सोडून सुंदर स्त्रीचें रूप धारण केलें. ज्या वेळेस त्यांतून कोणे एकानें वचनाप्रमाणें अमृत प्राशन केलें ह्मणून त्याला विभागिलें— मोहिनीचें रूप धरून शिवाला मोहिलें. आणि भृगुस्त्रीचा तप भंग करावा ह्मणून तिचा शिरच्छेद चक्रानें केला. तेव्हां भृगुऋषी क्रोधाविष्ट होऊन "तूं मृत्युलोकीं सातवेळा मनुष्यजन्म घेशील" असा शाप दिल्हा. अवतारामधील त्याच्या आचरणाचा विचार आह्मी पुढें पाहूं. ब्राह्मण याला सत्वगुणी ह्मणतात परंतु त्याच्या भावाप्रमाणें रज तमें करून भरलेला आहे.

भट्टानें असें ह्मटलें आहे कीं "ब्रह्माला संहार समयीं रुद्र असें नाम होतें." जर पार्वती एथें असती तर आपल्या पतीचें वर्णन विस्तारानें सांगती. आणि जर त्याजपाशीं बोलत असे तसें एथें बोलती तर आह्मास कांहीं एथें लिहिण्याचें प्रयोजन नव्हतें. परिणयाच्या दिवसीं शिव

पा

पार्वतीसहवर्तमान नग्न होऊन कामरूप नामक ग्रामीं वृषभारूढ होऊन फिरला यांत तिची मर्यादा कशी रक्षिली? शिवपूर नगराच्या गणिकावास स्थानीं भिक्षाटण करून वेश्याशीं रमला. अशा दुराचरणामुळें पार्वतीनें त्यास बहुत गाळिप्रदान केलें— त्यानें भिक्षाटणाविषयीं फार आळस केला यामुळें पुत्रासहवर्तमान पार्वती क्षुधातूर होऊन जीव जाऊं लागला— आरक्ताक्ष होत तोंपर्यंत तो मद्यप्राशन करी. यामुळें त्यांचा फार नाश झाला— समुद्र मंथन समयीं हालाहल प्राशन करून मूर्छित झाला तेव्हां पार्वतीला सावध होण्यासाठीं हस्तावर घेऊन आंदोलन करणें आवश्यक झालें— ज्याकाळीं शनीनें गणेशाचें भस्म केलें तेव्हां शिवाच्यानें कांहीं साह्य करवलें नाहीं.— अत्रिऋषीचा तपोभंग करण्यासाठीं शिवानें नग्न होऊन नृत्य केलें यामुळें त्याचें जें पारिपत्य झालें त्याचा उच्चार लज्जेमुळें माझ्यानें करवत नाहीं.— एकवेळ मोहिनीशीं संग करावा ह्मणून आपल्या तपस्येचें पुण्य देण्यास सिद्ध झाला आणखी त्याचीं दुराचरणें व कुकर्में पुढील कथनकावरून ध्यानांत येतील.

ब्रह्मदेवाचा पुत्र दक्षप्रजापति त्यास साठ कन्या होत्या. त्यांतील कनिष्ठ दाक्षायणी कन्या शिवास दिल्ही.

नं

Oriental MSS. Library
P.O.

नंतर तो भिकारी अंगास रक्षा लावणारा स्मशानवासी कं
ठीं रुंडमाळा अशीं त्याचीं कर्मे अवलोकन करून दक्ष ब-
हुत क्रोधाविष्ट झाला. असा मला जामात शोभत नाहीं या
मुळें परस्परें वैमनस्य असे. कोणे समयीं दक्ष यज्ञ करण्या
स सिद्ध होऊन वशिष्ठादि सर्व ऋषी आणि इंद्रादि सर्व दे
व व सर्व राजे यांस यज्ञ समारंभास आमंत्रण देऊन एकु
णसाठ कन्यास भ्रतारासहवर्तमान आमंत्रण पाठविता
झाला. तेव्हां सर्व कन्या भ्रतारांसह विमानांत बसून
आकाशापंथें जातां दाक्षायणीनें पाहून बापानें माझा
अपमान केला. यामुळें बहुत दुःखीत होऊन शिवापा-
शीं बोलूं लागली कीं आपण दक्षाच्या यज्ञास चलावें. ते-
व्हां शिव बोलिला कीं निमंत्रणावांचून जाणें थोरास यो
ग्य नाहीं. यास्तव तूंही जाऊं नको गेलीस तर मरणें
पावशील. असें सांगितलें असतां तिला चैन पडेना या
स्तव धवाच्या आज्ञेवांचून यज्ञास गेली. तिला मळीण
भिकारीण अशी पित्यानें पाहून तिचा फार अपमान के
ला. तो नसाहून अग्निकुंडामध्यें उडी घालून देहभस्म.
करिती झाली. हें वर्तमान नारदानें शिवास निवेदन
केलें. तें ऐकून मोठा क्रोध येऊन आपल्या जटा भूमी
वर आपटल्या त्यांपासून मोठा पराक्रमी त्रिनेत्र एक
पु

पुरुष उत्पन्न झाला त्याचें नाम वीरभद्र. त्यानें शिवाच्या आ
ज्ञेवरून वेताळ झोटिंग ब्रह्मराक्षस भूतप्रेत पिशाचादि
क बराबर घेऊन यज्ञाचा नाश करून दक्षाचा शिरछेद
केला. मग ब्रह्मा विष्णु शिवास शरण आले. मग शिवानें
दक्षाच्या धडास अजाचें शिर लावलें. पुढें ती दाक्षायणी हि
मालय पर्वताची कन्या झाली तिचें नाम पार्वती ती शिवां-
स आर्पण केली. या कल्पित देवाच्या नामावरून त्याचें दु
ष्टत्व अतिघोरत्व प्रगट होतें. कृत्तिवास उग्र विरूपाक्ष क
पालभृत् भूतेश्वर भूत इत्यादि अशीं आहेत.

मागील वर्णिलेल्या गोष्टी लज्जेवांचून बोलायास को
ण शक्तिमान आहे? जे ग्रंथ हिंदुलोक सत्य मानितात त्यां
पासूनच ह्या काढिलेल्या आहेत. परंतु चित्त लावून ते शो
धिले असतां त्यांच्या मिथ्यत्वाविषयीं सिद्धांत होईल. ज-
री ब्राह्मण सांगतील कीं शास्त्रें खरें चरित्र वर्णन अथवा हे
तुगर्भ वर्णन आहेत तरी मागील गोष्टींवरून असा निश्च-
य होईल कीं ही देवापासून नव्हत. जें ब्रह्मा विष्णु शिव
त्याविषयीं मोरभट्टानें वर्णिलें आहे त्यांत भगवंताचा फार
अपमान भासतो. त्याचें दूषण निवारणार्थ भट्टाचा यत्न
सर्व व्यर्थ आहे असें पुढें स्पष्ट करूं. असे अवतार ईश्व
र कधीं ही धारण करणार नाहीं. त्यांत परस्पर बहुत
वै

वैपरीत्य आहे ह्मणून तत्संबंधीं व भंगवत्संबंधीं कांहीं ना
हीं· याविषयीं ब्रजमोहनानें कल्कत्यामध्यें सांगितलें आहे
कीं" तुह्मी ह्मणाल कीं हे सर्वदेव वेगळे. वेगळे नाहींत·
पृथक् पृथक् एक्या देवाचींच रूपें आहेत· उत्तर· त्यास
र्व देवांस भिन्न भिन्न शरीरें निरनिराळे निवास भिन्न भिन्न
कुळें पृथक् पृथक् उद्देश असे आहेत· कधीं एकमेकां-
वर प्रीति करितात कधीं एकमेकांचा द्वेषमानितात· कधीं
एकमेकांशीं कलह करितात कधीं. एकमेकांशीं मैत्री जोडि
तात· असें असतां ते एकच कसे होतील ? भांडें आणि
प्रावरण एकच आहेत कीं काय ? पशु आणि पुरुष एकच
आहेत कीं काय ? जर सर्व देव एकच आहेत तर ह्या विश्वां
त सर्व जे पदार्थ आहेत त्यांस एक असें ह्मणावें· ज्यांचीं
रूपें व रंग निरनिराळे आहेत आणि जे निरनिराळ्या जाग्यां
त वसतात आणि ज्यांची निरनिराळी बुद्धि जे निरनिराळीं
कर्में करितात ते सर्व एकच· कान नाहींत डोळे नाहींत
कांहीं इंद्रियें नाहींत असें तो ह्मणो आमच्यानें ह्मणवत ना
हीं·

ब्रह्मा विष्णु शिव यांचे पाप निवारणार्थ व्यासानें ज्या
गोष्टी लिहिल्या आहेत त्यांचा शोध करण्यापूर्वी कृष्ण
राम ह्यांचा आचार ध्यानांत आणावा लागतो· ह्यांचें स्त
व

वन व स्थापन होण्यासाठीं भट्टानें फार यत्न केला आणखी
ह्यांचा विचार झाल्यानंतर जें त्यानें देवाच्या पातकाविषयीं
लिहिलें आंहे तें एकत्र मनांत येईल· आणखी ज्या उत्तरा
मध्यें पौनरुक्ति नहोतां सकृत ज्ञान होईल·

कृष्णाची हलकी लाजित लबाड अयोग्य कर्में पा-
हून हिंदुलोक सभेमध्यें लबाड सौदे यांस कृष्ण साम्यता
देतात· शास्त्रांतील गोष्टीं प्रमाणें तो बहुत रांडगा होता·
त्यानें आयंघोष वैश्याच्या स्त्री कशी हरिली व तिशीं कसा
रतला हे सर्वांस ठाऊक आहे· आणखी यामुळें जे सर्वांहू
न अधम दुष्ट त्यांस राधाकृष्णाची उपमाही देतात· आ-
णि सोळा सहस्र गोपिकांशीं क्रीडा केली आणि दंडाच्या
घोड्यानें रात्रौ सुंदर स्त्रीचें रूप धारण केलें तिला धरण्या
साठीं जीं व्यर्थ लज्जायमान साधनें त्यानें केलीं तीं अतिअ
पवित्र मनांवांचून कोण वाचायास शक्तिमान होईल ? त्या
ला चोर ह्मणावें· त्यानें गवळिणीपासून गोरसादि व यज्ञ
समारंभीं जाणाऱ्या रजकाचीं वस्त्रें व माळिणीपासून पुष्प
माळा व कंस दासीपासून चंदन इत्यादि पदार्थ चोरिले·
तो कलहकारी होता· निरुपयोगी कज्जा लढाया यांमध्यें ब
हुत करून होता· मिथ्यावादी होता युधिष्ठिराकरीव त्या
नें खोटी साक्ष देवविली यामुळें धर्माचा वामांगुष्ठा कळू
न

न नरक दर्शन झालें. तो हत्यारी होता त्यानें आपला मातु
ळ कंस रजक इत्यादिकांस मारिलें. आणि मरण्याच्या पू
र्वी आपल्या सर्व कुटुंबाचा ध्वंस केला. अज्ञानी अशक्त
तो असतां स्वेच्छेवांचून व कबूल होण्यावांचून वाळीच्या बा
णानें जिवें मारलागेला.

रामचंद्राचें चरित्र कृष्णाइतकें वाईट नाहीं परंतु
देवांच्या अवताराविषयीं फार अयोग्य आहे. अहममता
मूर्खत्व अज्ञानत्व अशक्तता व पाप असे याचे पूर्णस्वभा
व दिसतात. तेतिसकोटि देव राम सेवक असतांही ज्या
काळीं रावणानें बंदिशाळेंत ठेवले तेव्हां त्यांस मुक्त कर-
ण्याविषयीं रामानें एक पाद विक्षेपही केला नाहीं. परं-
तु जेव्हां त्याची स्त्री सीता इला चोरून नेली तेव्हां वेडा
होऊन वनोवनीं सीता सीता करीत वृक्षादिक कवटाळ
ण करून कोठे गेली हें नजाणतां फिरत व्रतादिक करीत
होता. हनुमंत सुग्रीव इत्यादिकांवांचून त्याच्यानें बहुत
जाणवलें व करवलें नाहीं. वाळी व सुग्रीव हे परस्पर यु
द्ध करीत असतां त्यानें येऊन वाळीस बाणें करून दुष्ट
रीतीनें मारून त्याचें राज्य सुग्रीव सहाय होण्यासाठीं त्या
स दिलें. त्यास मारुती प्रमाणें रामेश्वरापासून अब्धि उल्लं
घून लंकेंत गमन करण्यास शक्ति नव्हती ह्मणून सेतुबं-

ध

धनासाठीं शिवालय पाण्यांत टाकून वानरसैन्येंकरीव
देवलिंगादिकांवर पाद देववून पैलतिरीं नेलें. आणि
जेव्हां रावणानें राम आर्जविला तेव्हां त्यास वचन दि
ल्हें कीं मी तुला कदापि कधींही मारणार नाहीं. हें व
र्तमान देवांनी ऐकून भयभीत होऊन गालिप्रदानादि
कीं रावणास क्रोधाविष्ट केला मग त्यास रामानें मारि
ला. रावणस्त्री मंदोदरी प्रियमरणशोकानें व्याकूळ
होत्साती त्याजवळ आली तेव्हां तिला नजाणून अखं
ड सौभाग्यवती हो असें वचन दिल्हें.— ज्या काळीं का-
ळ पुरुष रामदर्शनास आला तेव्हां उभयतां अंतर्गृहीं-
जाऊन लक्ष्मणास आज्ञा केली कीं कोणाला आंत ये
ऊं देऊं नको. असें असतां दुर्वासास आंत जाऊं दिल्हें.
असा त्याकरीव अपराध करवून इतक्या स्वल्प अप-
राधानें त्यास बाहेर टाकिला याप्रकारें त्याचा नाश केला
ह्मणून हा चांगला भाऊ दिसत नाहीं. आणि आपल्या
स्त्रीची अग्निकरीव परिक्षा करवून तिला स्विकारून
स्वदेहापासून तिच्या उदरीं गर्भसंभव असतां सीतेला
अरण्यांत वाल्मीक गृहीं घालविली. यास्तव त्याला
सद्भर्ता व सत्पिता ह्मणवत नाहीं. आणिपुनः तिची परि
क्षा केली. हें तिची माता पृथ्वी इनें अवलोकन करून

सी-

सीतेला पाताळांत नेलें.

हिंदुलोकांच्या मुख्य पांच देवांवर त्यांविरुद्ध जे दोषप्रक्षेप केले ते ह्यांमध्यें मुख्य आहेत. त्यांचें चांगलें अवलोकन केलें असतां ह्यांत पुण्याचा लेशही नाहीं असें सांगावें लागतें. ह्यांचें स्थापन करण्यासाठीं ज्या गोष्टी मोरभट्टानें लिहिल्या आहेत त्यांचा विचार आतां आह्मी करितों. त्या कारणावांचून मी उलट करणार नाहीं. जर मीं कारणावांचून अधांटी घेईन तर प्रत्युत्तर त्याला द्यावें लागेल.

१ ज्या कामावर आह्मी दूषणारोप करितों याविषयीं मोरभट्टानें असें लिहिलें आहे कीं "आह्मी ईश्वराच्यानुराधानें ह्मणतों कीं सर्व देवांचीं सत्कर्मेंच होत." हिंदुशास्त्राप्रमाणें हीं सत्कर्में होत परंतु ह्याच कारणावरून हीं शास्त्रें खोटीं व देवापासून नाहींत असें दिसतें जर चोर चोरी करून त्याचा दोष नाहीं ह्मणून जीं निमित्तें सांगतो त्यांवर विश्वास न ठेवावा तर पापावर दूषण येत नाहीं अशा शास्त्रप्रसिद्ध मतावर विश्वास न ठेवावा. शास्त्रांतील गोष्टी सत्य मानण्या पूर्वीं जे त्याचे दोष गणण्यांत येतनाहींत त्याचा पहिल्याने परिहारच करावा "शास्त्राचा जर एक अंश मानशील तर संपूर्ण मानावें. ई

श्वरावतारानें अमुक कर्में केलीं याविषयीं शास्त्रांतील सांगितलेलें जर मानाल तर ह्या कामांत काहीं पाप नाहीं ह्मणून शास्त्राच्या वचनावरही विश्वास ठेवावा." असा प्रलाप आह्मी बहुतवार ऐकला. त्याचें उत्तर ईश्वरी अवतारांस करणें असंभावित आहे. आणि तादृश कूकृत्य ईश्वरी शास्त्रांच्या बोलण्यांत येणार नाहीं. हिंदुशास्त्रांत ज्याप्रमाणें दोन्हीं गोष्टी प्रसिद्ध आहेत त्या केवळ भ्रांतिकर व मिथ्या आहेत.

२ भट्टाचें मत आणखी असें आहे कीं देवाच्या सांगितलेल्या पापांचे "श्रवण उच्चारणें करून जीवांची अज्ञानदशा व तज्जनित कामक्रोधादिक जाऊन जीवांच्या ठायीं शुद्धसत्वादिक गुण उत्पन्न करण्यास मूर्तिपूजेसारखीच योग्यता आहे." परंतु जीवांची अज्ञानदशा व तज्जनित कामक्रोधादिक या उपायांनीं कसे जातील हें त्याच्यानें काहींच दाखवलें नाहीं आणि दाखववत नाहीं. मूर्तिपूजेसारखीच त्या उपायांची योग्यता असेल. परंतु ही चाल केवळ पापिष्ट व सुभक्तिविरुद्ध आहे याविषयीं आह्मी पुढें सर्व प्रदर्शित करूं.

३ कीं ज्या देवाच्यां कर्मांवर आह्मी दोषारोप करितों तीं मात्र सत्य आहेत यांचें प्रतिपादन करण्यासाठीं

भट्टानें अशी युक्ति लिहिली आहे कीं " तीं सत्कर्में कशी
याजविषयीं उत्तर ऐकावें सत्कर्म आणि दुष्कर्म हें त्यात्या
कर्मांच्या परिणामीं समजतें. ज्याचा परिणाम सत्शास्त्र
विचारानें चांगला तें सत्कर्म ज्याचा परिणाम सत्शास्त्र
विचारानें वाईट तें दुष्ट कर्म. चोरी केली असतां दंड घ
डतो ह्मणून चोरी वाईट कर्म." उत्तर ज्यापापाच्या परि
हार तारणारानें होत नाहीं त्याचा परिणाम सर्वदां वाईट
च होईल याविषयीं संशय नाहीं. परंतु जरी परिणाम ठा
ऊक नाहीं तरी पाप आहे असें पक्केपणें दिसेल. जर शा
स्त्रपरिज्ञानहीन रामोशी मावळच्या खेडेगांवीं राहणार ये
ऊन ब्राह्मणाची चोरी करून व पायपोस मारून नानाप्रका
रचे उपद्रव करील आणि लगला दंड चुकेल तर ब्राह्मण
च त्याला दोषी ठरवील. ज्या ग्रंथीं अशी गोष्ट सांगितली
असेल कीं त्यास दोष नाहीं अशा ग्रंथावर ब्राह्मण विश्वा
स ठेवणार नाहीं. हा दृष्टांत ध्यानांत आणून ही एक दुस
री गोष्ट पाहावी. बहुतकरून हिंदु देवांच्या कर्मांचा परि
णाम वाईट आहे असें तत्त्वशास्त्र पर्यालोचनें करून दिस
तें. स्वदुहीच्याठायीं रतल्यानें ब्रह्म्याचा सर्व पुण्य नाश झा
ला असाच. आणीक कांहीं पातकांमुळें त्याची मर्यादा व
पूजा भंग झाली व त्याचें शिर पतन झालें असें एक्या पु
रा

राणीं आहे. असा त्याचा वाईट परिणाम झाला.—शिव
शापग्रस्त होऊन लिंगपतनी झाला. व कुळांतील स्थैर्य
गेलें असा त्याचा वाईट परिणाम झाला. कृष्ण पशुव
त् अरण्यामध्यें मारला जाऊन त्याच्या प्रेतास अग्नी व
मूठमाती न मिळतां पशु कीटक पक्षांदिकीं भक्षिला गेला.
असा त्याचा वाईट परिणाम झाला. त्याचेंच रूप जगन्ना
थ हस्तपादहीन होता. त्याला कोणी विचारलें कीं तूं अ
सा व्यंग कां तेव्हां त्यानें सांगितलें कीं कृष्णरूपी मीं गोकु
ळवृंदावनीं नानाप्रकारच्या क्रीडा केल्या त्यांपातकामुळें
हा दुःखरूप व्यंगपणा मी भोगतों. रामाचीं लेकरें भाऊ
स्त्री गमावली त्यामुळें त्याणें नदींत उडी घालून जीव दि
ल्हा. असा त्याचा वाईट परिणाम झाला. याप्रमाणें स
र्वांचे परिणाम वाईट होते आणि भट्टाचे लिहिण्यानुसा
रही ते दुष्टकर्मी असें सिद्ध होतें. ह्या लिहिण्यावरून असें
झालें कीं मोरभट्टानें अछेद्यस्वलेखनरूप पाशबंधन स्व-
करें आपले कंठीं केलें असें सर्वांस स्पष्ट दिसेल. " अ
वतार आपले निजरूपास विसरत नाहीं ह्मणून अव
तारकृत कांहींएक विकार यांस बाधित नाहीं." याचो
लण्यामध्यें कांहीं उपयोग नाहीं. तो कबूल होतो कीं दे-
वाचीं कर्में लोकदृष्ट्या दुःखद होतात. मागे दर्शविलें
आ

आहे कीं देवांस बहुत दुःखें झालीं व यारीतीनें वाईट
परिणाम अस्तां यांचे कर्मास दुष्ट ह्मणावें · आतां ह्यापेक्षां
फार काय बोलावें ·

४ हिंदुदेवांचे पापांचे दूषण निवारणार्थ भट्टानें अ-
सें सांगितलें कीं ज्यां संबधीं पापें होतीं त्यांपासून त्यांस ला
भ झाला · हाविषय ज्याग्रंथीं आहे त्यांचे उल्लेखन करितों “
कृष्णानें व्यभिचार केला · राम सीतासीता ह्मणत अरण्यां
त फिरला · पराशर जो महानऋषी त्याणेंही व्यभिचार केला ·
हीं वचनें तुह्मी खरीं मानून ज्या पुस्तकांपासून घेतां · त्या
पुस्तकांत स्पष्ट लिहिलें जातें कीं शुद्धाचरणानें रहाणार
जे योगी त्यांस जो दुष्प्राप मोक्ष तो व्यभिचार वृत्तिनें वर्त
णाऱ्या ज्या गोपस्त्रिया त्यांस दिला · असेंच चोरांसंबंग
उद्याविषयीं आणि अन्याविषयीं केलें · अहाहा ” “ प
राशरानें व्यभिचार केला तेणेंकरून जो पुत्र झाला तो
सर्व जगवंद्य व वेदशास्त्रांच्या व्यवस्थापक · असलापु
त्र कसेंही उत्तमप्रकारें लग्नकरून तिशीं वर्तलेंतरी उ
त्पन्न होणार नाहीं यास काय व्यभिचार ह्मणावें ” जर
हिंदुलोक असा तर्क करित नसत तर बहुत भ्रांतिक
र अस्तां अशुद्धनीति दाखवित अस्तां यांविषयीं मी कां
हींच नबोलेन · ज्याज्या विरुद्ध पापकेलेलें आहे त्यावर

उपकार करण्यास कोणी शक्तिमान असेल तर पापांत पा-
प नाहीं असें होत नाहीं · कोणेएका विरुद्ध उपद्रव केला
आहे आणि जरी उपद्रवामुळें कांहीं दिलें आहे तरी उपद्रव
नझाला असें कोण मानील · व्यभिचारिणी स्त्रियांस व्यभि-
चार निमत्त सोद्यानें मोक्ष दिला व संचगउद्यांस चोरी निमित्त
मोक्ष दिल्हा · जगवंद्य वेदशास्त्र व्यवस्थापक असा पुत्र हो-
ण्यास लग्नापेक्षां व्यभिचार उत्तम आणि त्यांत पाप नाहीं
अशागोष्टी निर्लज्जपणें ऐकायास कोण शक्तिमान आहे?
जर अशा मानल्या जाऊन त्याप्रमाणें लोकवर्ततील तर त्रै-
लोक्यामध्यें लोकांची संस्थापना नहोतां अशुद्धता · हरण व
हत्या इत्यादिक होऊन देवाचा अपमान व दुर्भाषणें मात्र हो-
तील · ज्याज्या हिंदूला किंचित ज्ञान असून पापाचें भय अ
सेल त्यांसमीं मोठ्या आग्रहानें सुचवितों कीं आपलीं शास्त्रें
गुरु यांचे जे वाईट उपदेश उघांत व लौकिकांत सांगतात आ
णि धर्माचें भूषण दाखवितात त्यांचा शोध करून त्याग क
रावा ·

५ हिंदुदेवांचे पापनिवारणार्थ भट्ट असें दुसरें निमित्त
सांगतो कीं श्रीरामचंद्राच्या आचरणांत तर लोक अभिवं
द्य जे सत्य नम्रता आपल्या सख्यांच्याठायीं अत्यंत कृपा
ळुत्व अतिदुःखद प्रसंगीं पितृमातृ आज्ञावंदन परोपका

[illegible] Oriental MSS. Library,
[illegible] P.O., Mad[illegible]

रिव अगाध महात्म्य अशीं दाखविलीं आहेत" "तर
जो त्याचा जिवेंभावें झाला आहे त्याजविषयीं तोही जी
व टाकीत आहे. असें लोकांस दाखवून आपल्या भक्ती
स लावण्याविषयीं लोकांस हेतु सिद्ध करावा आणि वन
संबधीं कितिएक जीवांचा उद्धार व्हावा ह्मणून तो वनां
त हिंडूं लागला अशीच त्याचीं इतर कर्मे सहेतुक आ-
हेत" रामानें आपल्या भक्तांस विसरून त्यांचा बंध मु
क्त करण्यासाठीं कांहीं एक यत्न केला नाहीं. याच्या-
कर्मांवर कांहीं भरंवसा नठेवावा हें मागें उक्तच आ
हे. आमच्या वाद्याला आपल्या बोलण्यापासून काय-
लाभ होईल तो मला पाहावत नाहीं. जर कोणे एका-
वर एकमात्र पाप भासतें तर त्यावरून स्पष्ट होतें कीं
तो निश्चय देवाचा अवतार नव्हे. तर हिंदुदेवानीं बहुत
महापापें केलीं ह्मणून त्यांविषयीं कोणाएकास कांहीं बो
लायचें नाहीं. जसें प्रसिद्ध चोर व मिथ्यावादी व्यभि-
चारी हत्यारी घातक याजवर संसारभार कोणी ठेवणार
नाहीं तसें हिंदुदेवावर कोण विश्वास ठेउन सेवा करील?
मोरभट्ट मतानुसारी एक गुर्जर ब्राह्मण यानें माझ्या गृहीं
भाषण केलें कीं "देवांचीं सुकर्मे व दुष्टकर्मे यांचें परि
माण करून पहावें ह्मणजे कोणतें वजनास विशेष भ
रे

रेल तें समजेल" मग त्यावर मी उत्तर असें केलें कीं जो
न्यायाधिशापुढें आरोपी ठरेल त्यास पुण्य पाप गणनरीती
प्रमाणें न्याय होणार नाहीं परंतु त्याचे दुष्टकर्मानुसार
न्याय ठरून शिक्षा होईल.

६ देवाच्या थोरपणानें त्याच्या पापाचा दोष जातो
असें भट्टानें सांगितलें आहे तें असें कीं "ईश्वर आणि
जीव यांच्या आचारांत असा भेद आहे. ईश्वर स्वतंत्रप
णें वर्ततो आणि जीवास ईश्वराची आज्ञा जें शास्त्र त्याप्र
माणें वर्तावें लागतें. ह्मणून स्वतंत्र वर्तणारा जो समर्थ त्या
स दूषण लावणें हें अयोग्य होय" याला उत्तर सिद्ध आहे.
ईश्वर अतिसामर्थ्यवान् असतां स्वतंत्रपणें वर्ततो परंतु
आपल्या स्वभावविरुद्ध त्याला कांहीं करवत नाहीं. तो प
वित्र असतां निश्चय आपल्या पवित्रतानुसार वर्तेल.
याविषयीं जर कोणी संशयी होईल तर त्यास मोठें पाप
लागेल. पापाचा द्वेष करण्यानें व पापामुळें दंड लावण्या
नें देवाची पवित्रता प्रगट होते आणि असें संपूर्ण पवि
त्रते विरुद्ध देवाच्यानें कांहीं करवत नाहीं. हें मूळका
रण मानून देवानें लोकांस सर्व आज्ञा दिल्या. आपला स्व
भाव व इच्छा सुगुण महत्व यां विपरीत कांहीं त्याला आ
वडत नाहीं. जीं कर्मे जनास निषेधिलेलीं जीं देवाच्या-
हे

दृष्टीसमीप कोधयोग्य आणि त्याविषयीं तो सांगतो कीं मी
निश्चय दंडलाचीन याविषयीं समजावें कीं तीं स्वभावविरुद्ध
ह्मणून त्याच्यानें करवत नाहींत. देवानें अशीं कर्में केलीं
असें जो ह्मणेल तो अत्यंत कुभक्त जाणावा आणि ज्यां ग्रं
थीं असें सांगितलेलें असेल ते अग्नींत टाकावें. जर स्वने
म देवच नमानील तर त्यावर विश्वास कसा होईल?
जर सर्वत्र प्रतिष्ठा त्याला नसेल तर संपूर्ण त्याजवर प्री-
ति कसे करितील. याचें आचरण एक गोष्टीतही अपवि
त्र जर असेल तर विश्वाचा वंदोबस्त तुटून फितुर व नाश
होतील. थोरपणामुळें देवाचे पापाचा परिहार होत नाहीं के
वळ थोरपणामुळें पापोपद्रव वृद्धि होते. यामुळें याजवर अ
धिक दोषाभास होतो. असें असतां भट्टाचें मत व्यर्थ आहे. हें
कांहीं हिंदुशास्त्रांप्रमाणें आहे आणि कांहीं दुसरे हिंदुशास्त्रां
विरुद्ध आहे. या गोष्टीचें प्रामण्यार्थ भगवद्गीतेंतील श्लोक लिहितों

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः
लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ॥ १ ॥
यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ २ ॥
न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त्त एव च कर्मणि ॥ ३ ॥

य

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः
मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ ४ ॥
उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यात्कर्म चेदहं
संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥ ५ ॥
सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत
कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहं ॥ ६ ॥

या श्लोकांचा अर्थ. कर्में करूंनच जनकादिक राजे उत्तम
सिद्धीप्रत पावते झाले याजकरितां पार्था तूं लोकसंग्रह जी
त्यातेंच पाहात होत्साता कर्म करावयाकारणें योग्य आहे-
स ॥ १ ॥ श्रेष्ठ पुरुष जेंजें कर्म करितो तसा संपूर्ण लोक त्याचें
पाहून तसें तसें आपणही त्यासारिखेंच कर्म करितो ॥ तो श्रे
ष्ठपुरुष जें प्रमाणभूत कर्म करितो त्यासारिखें लोकही-
त्याचाच अनुकूल्येंकरून वर्ततो हे ॥ २ ॥ हे पार्था मला ति
हीं लोकांच्याठायीं कांहीं एक कार्य करावयाचें नाहीं तसेंच
मला अप्राप्यही त्रैलोक्यांमध्यें कांहीं नाहीं आणि कांहीं ए
क वस्तुमात्र प्राप्त व्हावयाची आहे असाही अर्थ नाहीं प
रंतु असें असतांही मी कर्माच्याठायीं वर्ततों हे हे पार्था
जर मी कर्माच्याठायीं कधींही आलस्यरहित होत्साता
नाहीं वर्तता झालों तर पार्था हे संपूर्ण लोक सर्वप्रकारें क
रून माझ्याच मार्गेकरून चालतील याविषयीं संशय नाहीं.

॥ ३ ॥

॥३॥ हे पार्था जरमी कांहींएक कर्म नाहीं करिता झालों तर
हे संपूर्ण लोक कर्मापासून उच्छेद पावतील आणि कांहीं
एक कर्मही करणार नाहींत ॥ आणखी मी ही संकर उ-
त्पन्न करणारा होईन आणि ह्या जितक्या संपूर्ण प्रजा आ
हेत तितक्या प्रजांच्या नाश करणाराही मीच होईन ॥४॥
हे भरतकुलामध्यें उत्पन्न पार्थारे जसे अविद्वान पुरुष क
र्मांच्याठायीं संसक्त होत्साते जसीं कर्में करिताहेत तसाच
विद्वान पुरुष जो तोही लोकसंग्रहार्थ जो त्यातेंच करावया
कारणें इछित होत्साता कर्मांच्याठायीं सक्त होऊन सक्ति
पुरःसर कर्में करितो ॥५॥ कीं हे शब्द कृष्णानें सांगितले
होते असें गीतेंत आहे. हा ग्रंथ देवमुखापासून नाहीं
असा माझा निश्चय आहे परंतु उल्लेखनाचें कारण वादी
मुखस्तंभनच आहे. आणखी ही एक गोष्ट पाहिली पाहि
जे जरी कोणी एक कबूल होईल कीं हिंदुदेव स्वतंत्रें वर्त
तात तरी ह्यांत भट्टाचें मतस्थापन होणार नाहीं कांकीं
जीं पापें हिंदुदेवांवर भासतात तीं बहुतकरून एकमेकां
विरुद्ध झालीं. उत्पन्न केलेल्या लोकांविषयीं देव आप-
ल्या इछेप्रमाणें वर्ततील याप्रमाणें जरी वादार्थ कोणीए
क कबूल होईल तरी परस्पर कज्जा करणें एकमेकाला
शापदेणें व एकमेकाला उपद्रव करणें व युद्ध करणें अ
शीं

शीं कर्में करण्यास पापावांचून देव योग्य होतील कीं-
काय? ह्यांनी क्रीडा लीला केली असें बोलणें केवळ
प्रलापी आहे. पापाचें दूषण सर्वदां ह्यांवर राहतें." दे
वानें लोकांसारिखें चालावें असें कां ह्मणतां" याह्मणण्यां
त कांहीं नाहीं. लोकांपेक्षा ईश्वराचें आचरण अधि.
कउत्तम होईल यांत संशय काय ?
७ हिंदुशास्त्रांत देवाचें जें वर्णन आहे आणि ख्रीस्ती
शास्त्रांत जें ईश्वराचेंव येशू अवताराचें निरूपण आहे
तो निरूपणा हिंदुदेवांचे प्रतिपादनार्थ मोरभट्टानें सां
म्यतेस लाविलें. त्याच्या ग्रंथीं विविधस्थलीं ह्याविषयीं-
च्या कांहीं गोष्टी लिहिल्या आहेत. ही गोष्ट दुर्दैवणी प्र
सिद्ध केली असती तर त्याचा मतभंग झाला असता
आणि त्याच्या धर्माचा सुलभोपायानें ध्वंस झाला असें
त्याला स्पष्ट दिसलें असतें. ज्या गोष्टी त्यानें लिहिल्या आ
हेत त्या न्यायाच्या मार्गाप्रमाणें नाहींत आणि त्यामध्यें
बहुत चुका आहेत " तरी ख्रीस्ती मतांतरीं शास्त्राप्र
माणें एक ईश्वर प्रतिपादिला आहे" ह्मणून त्यानें सां
गितलें तें ठिक आहे. ह्या शास्त्रांत देव अत्यंत गौरव
युक्त असतां त्याला सर्व उत्तम गुण व संपूर्ण उत्कृष्टता
असें सांगितलें आहे. अस्तित्व ज्ञान पराक्रम पवित्रता
न्या

न्यायत्व औदार्य सत्यता यांविषयीं तो अत्यंत शाश्वत निर्विकार असें यांमध्यें सांगितलें आहे. त्यावर केवळ सुगुणारोप ख्रीस्ती शास्त्रें करित नाहींत तरी त्याच्या नित्यक्रियेवरून प्रसिद्धीस येतात. सृष्टिसमयीं आपल्या कामाच्या अडचणीमुळें दुःखित भ्रांत होऊन नीच व मूर्खउपाय कामांत आणणारा हिंदुस्रष्ट्या सारिखा नाहीं परंतु आपल्या पराक्रमी शब्दानें सूर्य चंद्र तारे इत्यादिकांचा उत्पादक व स्वकीय इच्छानुसार त्यांचा रक्षक आणि तदंतःपाति विविधप्राणी यांचा संजीवक असा त्याला ख्रीस्तीशास्त्रें प्रदर्शवितात. राज्यचालवण्यास आपल्या सहवास्यांच्या युक्तीनें मनुष्यांच्या पुण्यानें भूतांच्या पराक्रमयोगानें राज्यभ्रष्ट होण्याविषयीं भयभीत असें हिंदुदेवांसारिखें त्याचें निरूपण करीत नाहींत. परंतु आपल्या नियमाप्रमाणें सकल पदार्थांचा व्यवस्थापक दुष्टलोकांचा नियंता व दंडकर्ता असें त्याचें गौरवाच्छादन करण्यास ही जे यत्न होतात त्याच यत्नेंकरून स्वमाहात्म्य प्रदर्शक याप्रकारें त्याचें वर्णन करितात. पालनसमयीं विष्णुसारिखें आपल्या लोकांस फसविण्यामुळें आपली प्रतिष्ठा बुडविली परंतु आपली पवित्रता मानून आणि कृपाळुत्व

प्रगट करून सर्वजीवांचें पोषण करितो असें त्याला प्रतिपादितात. पापी व फितुरी माणसांचें दान जप तप व कर्में ही पाहून तो उगाच दया करितो असें हिंदुशास्त्राप्ररचें सांगत नाहींत परंतु येशूख्रिस्ताचीं कामें व पुण्य पाहून या उपायानें तो आपलें न्यायत्व व पवित्रता व दया प्रगट करून दोषी लोकांस तारितो असें हीं शास्त्रें दाखवितात.

बाप व पुत्र व पवित्र आत्मा हे तीन मिळून एकच देव आहे या मतानें ईश्वराच्या एकपणांत अंतरपडत नाहीं हें भट्टाला बहुतकरून ठाऊक आहे. आणखी त्यानें जाणावें कीं त्यांहींकरून देव गौरविला जातो. खऱ्या व जीवंत देवांत बाप पुत्र व पवित्र आत्मा असे जे तीन आहेत त्यांस गुण पराक्रम व इच्छा एकसारिखीच आहेत. हिंदुदेवांसारिखे ते पदवीविषयीं आपआपल्यामध्यें कलह करीत नाहींत. एकमेकांचीं कामें विपरीत करायास ते कधींहि हिंदुदेवांसारिखे झटत नाहींत. परस्पर एकस्थितींत अनंतकाळ असतात. कीं एकाला प्रारंभ झाला म्हणून पुत्राचें नाम दिलें आहे असें नाहीं तर तो अनादि अनंत आहे. बाप पुत्रयांचा स्वभाव एकच आहे आणि पिता पुत्रवत् प्री-

त्यावलंबन त्यावर करितो आणि पुत्रही पित्याचें गौरव प्रगट करितो यामुळें तो पुत्र ह्मणविला जातो. कीं त्यानें लोकांच्या पापाचे प्रायश्चित्तार्थ मनुष्याचा प्राण व शरीर याचें धारण केलें. याच्या अवतारामध्यें आणि पवित्र आत्म्याच्या रूपामध्यें कांहीं पाप झालें नाहीं. ईश्वराच्या महात्म्यास व थोरपणास कांहीं अयोग्य झालें नाहीं. आणि त्याच्या व्यापकत्वाविरुद्ध कांहीं झालें नाहीं. त्यांविषयीं ज्या गोष्टी ख्रीस्तीशास्त्रांत लिहिलेल्या आहेत आणि ब्रह्मा विष्णु शिव रामकृष्ण इत्यादिकांविषयीं ज्या गोष्टी हिंदुशास्त्रांत लिहिलेल्या आहेत यां उभयतांमध्यें कांहीं समानत्व नाहीं. हा विचार व जीं मतें याविषयीं भट्टांनें सांगितलेलीं आहेत त्यांचा शोध पुर्लेपणीं केला पाहिजे.

(१) येशूख्रीस्त अवतार आणि रामकृष्ण इत्यादिकांचे सांगितलेले अवतार यांच्या उद्देशांत बहुत तारतम्य आहे. रावणाचा ध्वंस करावा ह्मणून रामावतार झाला परंतु हें काम केवळ हलकें व देव अवतारास अयोग्य आहे. देव जो सर्वशक्तिमान त्याच्यानें हें अवतार धरण्यावांचून करवतें. जो सर्वांस जीवन देणारा तो नाश करण्यास शक्तिमान नाहीं कीं काय? कंस इत्यादिक मार

ण्या

ण्यासाठीं कृष्ण अवतार झाला. हा उद्देश रामअवतारासारिखा आहे. यामध्यें अवतार घेण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. आणि हें काम झाल्यानंतर कृष्ण लोकांमध्यें बहुत दिवसराहून सर्वांस फार उपद्रव व पातक करिता झाला. जे येशूख्रिस्तास शरण जातील त्यांच्या पापाचा दंड भोगण्यासाठीं आणि देवाची पवित्रता व स्वच्छता प्रगट करण्यासाठीं आणि विश्वासूंस देवलोकीं नेण्यासाठीं गौरवयुक्त व सुखी करण्यासाठीं ख्रीस्त अवतार झाला. याचा उद्देश महत्व व अवतार तेविषयीं योग्य आहे. अवतारावांचून हें काम होणें अशक्य आहे ही गोष्ट लोकांच्या दृष्टोत्पत्तींत येती. तरी मोरभट्टानें लिहिलें आहे कीं "जगदोद्धारार्थ दुसरा मार्ग नाहीं असें ह्मणतां देवाच्या अनंत शक्तित्वावर दुर्निर्वेह दूषण येतें" या मताविरुद्ध असें मी ह्मणतों कीं जसें दुष्टराक्षसांस मारणें यत्संबंधीं तसा लोकांचा उद्धार करणें तत्संबंधीं देवाचा पराक्रम केवळ नाहीं परंतु त्याचें न्यायत्व पवित्रता महात्म्य गौरव सृष्टीचा बंदोबस्त हीं सगळीं आहेत. पाप दंडास योग्य आहे असें असतां जर पापी तारले जातील तर देवाच्या कृपेकडून हें तारण होतें. आणखीं या गुणावांचून कधींहि लोकांस पापाचें शासन चुकणार नाहीं.

हीं · परंतु ह्यागोष्टींत मोठी अडचण आहे · देव अत्यंत कृ
पाळू आहे खरा परंतु तो अत्यंत पवित्र स्वच्छ आहे · कीं
पापाचा पूर्णद्वेष करितो पापसर्वांहून वाईट आहे आ
णखी तें केल्यानें सत्यनाश होईल असें लोक रक्षणार्थ
जर तो दाखवणार नाहीं तर देवाचें राज्य बुडेल · जीवां
च्या कर्मानें पापांचा दोष कधींही जाणार नाहीं · कांकीं
पापकरण्यास व पापाचें निवारण करण्यास लोक जर सा
मर्थ्यवान् होतील तर त्रिलोकांतील दूत इत्यादिक लोकां
चीं कामें व परिणाम पाहून आज्ञा व मान नकरून फि
तुरी होतील · ज्यामध्यें देवाचें कृपाळुत्व आणि देवाची पं
वित्रता व न्यायत्व समान दाखविलेलीं आहेत आणि
ज्यामध्यें माणसांचें कल्याण व तारण होतें आणि पापा
चें वाईटपण सर्वलोकांसमोर प्रदर्शित होतें असाच उ
पाय पाहिजे · तो ख्रीस्ती धर्मांत मात्र मिळेल · याच्यासि-
द्धांताप्रमाणें असें स्पष्टदिसतें कीं देवानें जगावर एवढी
प्रीति केली कीं आपला एकुलता एकपुत्र पाठवून दिला
कीं त्यावर जो कोणी विश्वास ठेवील त्यानें नाशास नजा
वें परंतु त्याला सर्वकाळाचें जीवन व्हावें · ज्यांस ताराव
याचें देवाच्या मनांत होतें त्यांविषयीं येशूख्रीस्त स्वप्री-
तीनें मानलेला जामीन व प्रतिनिधि होऊन त्यांच्या पापा
च्या

च्या दंड भोगण्यासाठीं मनुष्यांचा प्राण व शरीर धारण केलें ·
ज्या वेळेस येशूख्रीस्ताच्या पुण्यार्थ लोकांच्या पापाची देव
क्षमा करितो त्याच वेळेस पापाचें वाईटपण प्रगट करि
तो · गोष्ट अशी आहे कीं जसें येशूख्रीस्त लोकांच्याठायीं स्व
प्रीतीनें असतां बापानें त्यास रक्षिलें नाहीं तसें पापिष्टलोक
आपल्याठायीं असतां त्यांस तो रक्षणार नाहीं · देवानें आ-
पल्या पुत्राविषयीं जे केलें तेणेंकरून जर सर्व सृष्टीमध्यें
पापाचें नियमन होणार नाहीं तर स्पष्ट दिसतें कीं यानंत
र सर्वलोक आपल्या पापास योग्य असा दंड भोगावा लागे
लें ·

(२) रामकृष्णाच्या अवतारांचें व येशूख्रीस्ताच्या अव
ताराच्या आचरणाचें तारतम्य बहुत आहे · रामकृष्णादिकां
हीं घोर पाप केलें असें मागें प्रसिद्ध आहे · यांच्या कथनाम-
ध्यें कज्जे युद्ध नाश यांवाचून बहुतकरून कांहीं दिसत-
नाहीं येशूख्रीस्तांत स्वभावशुद्धता उत्कृष्ट कर्मत्व व देवाच्या
गौरवाच्या प्रसिद्धि करण्यावांचून दुसरें कांहीं दिसत नाहीं · त्या
ची आई कुमारी असतां देवाच्या पवित्र आत्म्याच्या पराक्र
मानें गरोदरी होऊन तो पापरहित जन्मपावला · देहांत होई
तोंपर्यंत पवित्रपणें वर्तला · त्यानें एक दुष्टकर्म किंवा दु
ष्ट भाषण किंवा दुष्टकृति केलीनाहींत · त्यानें एकही चुक
के

केली नाहीं· तो परोपकार करित असे आणि लोकांनी विश्वा
स ठेवावा आणि देवाचें गौरव प्रगट व्हावें म्हणून चमत्कार
करित असे· त्याच्या शब्दानें बहिरे ऐकूं लागले आंधळे पा
हूं लागले पंगू चालूं लागले रोगी निरोगी होऊन आनंद करूं
लागले· येशू समुद्रावर पायांनी चालिला आणि त्यानें मेलेल्यांस
जीवंत केलें· त्याच्या आचरणामध्यें चांगलीं कारणें होती
आणि त्यांमध्यें कांहीं कापट्य झालें नाहीं· कृष्णाच्या सां-
गितलेल्या चमत्कारांमध्यें लीला अप्रमाण निष्प्रयोजन इ-
त्यादि भासतात तशीं त्यामध्यें नव्हतीं· तो सर्व उपदेशकां
मध्यें श्रेष्ट होता· धनाढ्य अथवा दरिद्री उच्च नीच म्हातारे अ-
थवा तरूणही असोत त्यांस पक्षपातरहित भगवानाचें गौ
रव प्रगट करित असे· तो सर्वलोकहितसक्त असतां मोठे
पराक्रमी शब्द बोलिला त्यावरून वैरी कबूल झाले कीं या
सारिखा कोणी कधींहि बोलिला नाहीं· त्याचा उपदेश मौ-
ल्यवान होता व देवाचा स्वभाव माणसांच्या उद्धाराविषयीं
होता· जशीं रामकृष्णाचीं संभाषणें हलकीं भ्रांतिपूरित
होतीं तशीं त्याचीं नव्हतीं· माणसांच्या ठिकाणीं दंड भोग
ण्याकरितां येऊन येशूख्रीस्तानें हिंदुदेवांसारख्या क्रीडा-
नकरितां अवाच्य कष्ट दुःखें भोगिलीं· त्यानें आपणाला
मरणस्तंभीं स्थापावयास लोकांस दिल्हें· जगाचा भार त्यानें आपल्या

शिराव

वर घेऊन लोकांच्या उद्धारार्थ आपला प्राण दिल्हा· या-
सर्वदंड सहनांत त्याचें कृपाळुत्व व प्रीति इत्यादि अनं
त भासतात यामुळें हा विश्वासास्पद आहे म्हणून त्या-
ची सेवा करावी· हा खचित मेला असें लोकांनी समजा
वें म्हणून तीन दिवस कबरेंत राहिला मग स्वसामर्थ्या
नें पुनः उठून शिष्यांस आपल्या राज्याविषयीं उप-
देश करून आणखी त्यासर्व देशस्थांस पापाची क्षमा मि
ळवण्याचा उपाय त्याच्या नामानें मिळेल असें सांगावें
म्हणून आज्ञा देऊन लोक पाहत असतां आपल्या शरीरा
सुद्धां देवलोकीं गेला· ज्या जाग्यामध्यें देव आपलें गौरव
विशेषेंकरून प्रगट करितो त्यांमध्यें लोकांचा वकील व म
ध्यस्थ होऊन जे लोक त्याच्या नामानें व पुण्यानें आपल्या-
पापाची क्षमा व मनपवित्र होण्यासाठीं सर्वकालिक गौ
रव मिळवण्यासाठीं जी प्रार्थना करितात त्यांची ती देवाच्या
सन्निध मानली जाती· रामकृष्णाच्या कर्मांचें ख्रीस्ताच्या कर्मा
चें परिमाण केलें असतां हिंदुदेवांचीं कर्मे लघिष्ट दिस
तात·

(३) रामकृष्ण अवतार व ख्रीस्त अवतार यांच्या परि
णामांमध्यें बहुत तारतम्य आहे· मोरभट्टानें असें लिहि
लें आहे कीं “आमच्या सत्कर्में करून आह्मास मोक्ष प्रा

प्ति

प्ति होतनाहीं. तर कृष्णानें जीं सत्कर्में केलीं आहेत तींच
त्याच्याठायीं भावभक्ति ठेविली असतां तारतील." कृष्ण अ
वताराविषयींचा उद्देश मागें सांगितला आहे आणि तो के
वळ राक्षसांस मारणारा असतां याच्या कर्मेकरून तार-
ण होईल असें कोणीही समजणार नाहीं. लोकांच्या पा
पाचे निवारणार्थ त्यानें किंचित काम केलें नाहीं. जे याच्या
सांगितल्या येण्याअगोदर जगांत होते आणि जे सांप्रतका
ळीं आहेत त्यांस यापासून कांहीं लाभ होणार नाहीं.
परंतु आह्मी सांगितलेलें आहे कीं ख्रीस्तानें पापी लोकांक
रितां पापाचा दंड भोगिला. जेव्हां जगांत पापाचा प्रवेश
झाला त्यावेळेस त्याच्या येण्याविषयीं व कर्माविषयीं वच-
नें दिल्हें आणखी तो प्रारंभापासून लोकांचा जामीन होता.
ज्यांनी ह्यावर विश्वास ठेऊन त्याचे आगमनाची वाटपाहिली
ते त्याच्या पुण्याकडून तारले गेले. जे त्याच्या मागेंयेऊन-
त्याची गोष्ट ऐकून त्यावर विश्वास ठेऊन याचीं कर्में पाहा-
तात तेही तारले जातात. भट्ट असें लिहितो कीं "येशूख्री
स्ताच्या आचरणावरून लोकांस पापाचरण करावयास-
मार्ग मोकळा झाला. कसें ह्मणालतर येशूख्रीस्त सांगतो
कीं तुह्मी माझ्याठायीं मात्र विश्वास ठेवावा ह्मणजे तुमचीं
जुनीं नवीं पातकें मी आपल्या डोकीवर घेऊन तुह्मास मु

क्त

क्त करीन. अशा वचनावरून लोक जे सहजवृत्त्या पापप
रायण आहेत ते येशूख्रीस्तावर भाव ठेऊन यथेच्छ पा-
पाचरण करायास उद्युक्त होणार नाहींत कीं काय ?
परंतु ख्रीस्ती उपदेशाविषयीं भट्टानें ठीक लिहिलें नाहीं
असें त्याला वाटलें असेल कांकीं तो कबूल करितो
" तुह्मी ह्मणाल कीं अहो तसें नाहीं भावठेवणें याशब्दा-
चें तुह्मास विपरीत ज्ञान झालें. भाव ठेवणें ह्मणजे येशू
ख्रीस्तानें ज्या आज्ञा दिल्ह्या आहेत तदनुरूप वर्तणें." आ
णि येशू पापाच्या दंडापासून मात्र तारितो असें नाहीं तर
पापाचा पराक्रम व राज्य यांपासूनही तारितो ही ख्रीस्ती
मतांतील प्रथमगोष्ट त्याच्या ध्यानांत आली नाहीं. येशू
ख्रीस्ताच्या शुभवर्तमानांत विश्वासी लोकांस पापक्षमा
करशानें मिळेल हें लिहिलें आहे परंतु जे देवाच्या आज्ञा-
विषयींचें पवित्रपण न्यायत्व व चांगुलपण मानितात आ
णि जे तारकावर प्रीति ठेऊन त्याच्या आज्ञा वंदायास सि
द्ध आहेत आणि ज्यांला फितुरपणांत कांहीं आशा व शां
ति होणार नाहीं ज्यांच्या मनांत पवित्र आत्मा शिरून अव
गुण कुवासना काढितो आणि ज्या देवलोकांत कांहीं अप
वित्र राहूंशकत नाहींत तेथें जाण्यासाठीं पवित्र आत्म्या
कडून जे उत्तरोत्तर सिद्ध होतील त्यांस मात्र पापाची क्ष-

मा

मानिलेल ख्रीस्ती धर्मावांचून दुसऱ्या धर्मांत पवित्रतास्था
पक उपाय कांहीं नाहीं. जसा पित्यानें लोकांस तारा
यासाठीं पुत्र पाठविला आणि पुत्रानें त्यांस तारायासा
ठीं आपला प्राण दिल्हा तसा पवित्र आत्मा त्यांस तार
ण्यासाठीं मन शुद्ध करितो.

(४) रामकृष्णादि अवताराचे प्रमाणाविषयीं व येशू
ख्रीस्ताच्या प्रमाणाविषयीं बहुत तारतम्य आहे. रामा
दिकांच्या गोष्टींमध्यें केवळ वैपरित्य व असंभावना अ
निलज्जा अतिशयोक्ति दिसतात. ह्या देवकृत देवमानि-
त असतील असें बुद्धीला वाटत नाहीं. आणि ह्या केवळ
मानवकृत चरित्रीभूत आहेत असें समजून ह्या किंचि-
त विश्वासास्पद होतील असें दिसत नाहीं. तर ह्या गोष्टी
भूतराजांच्या सौख्यार्थ व लोकक्रीडार्थ स्वकीर्त्युद्दीपनार्थ
निजदृष्टोत्पन्नांपासून आत्मयुक्ती करून देशाचे अंधपरंप-
रानुसार हिंदुकवींनीं स्वकपोलकल्पित आहेत. नीतिविष
यक अशा गोष्टी स्वल्प यामध्यें मिळतात. आणि अकल्म-
ष मनाला कंटाळविणाऱ्या अशा बहुत मिळतात यावरू
न असें भासतें कीं ह्या देवनिर्मित नव्हत. जो प्रभु व तार
णारा येशू ख्रीस्त त्याचें चरित्र एतादृश नाहीं. त्याच्या गोष्टी
बुद्धीस सर्वप्रमाणिक दिसतात. प्रारंभापासून शेवटपर्यं-
त

त त्याची प्रसक्ति होती. औपयोगिक पवित्रकारक ज्ञानो
द्दीपक अशा त्यांतील गोष्टी आहेत. ज्याकर्मांत व ज्यास्थि
तीमध्यें अवतार होता त्यांतील पूर्तेपणीं गोष्टी सांगून त्या
च्या अतिपवित्रपणा निर्दोषीपणा दाखवून लोकांची खा
तरी होती कीं निश्चय अवतार झाला. ज्याग्रंथीं त्या लि-
हिल्या आहेत तो ग्रंथ असा आहे कीं देवावांचून अन्य
कृतीस असमर्थ. त्याणें देवाचें वर्णन केलेलें आहे आ
णि देवाची कृती प्रदर्शविली आहे आणि माणसांची अ
वस्था व उद्धाराचा मार्ग व पवित्रता प्रसिद्ध केली आहेत.
जो पृथ्वीवर सर्वांहून सूज्ञ त्यालाही ईश्वरसहायतेवां
चून करवत नाहीं. या गोष्टीविषयींच्या संपूर्ण शोधक
रावा ह्मणून हिंदुलोकांस विनंती करितों. नंतर ज्याप्रमा
णें मी सांगितलें आहे त्याप्रमाणें तुमचे अनुभवास येई
ल. ख्रीस्तीशास्त्राची जगामध्यें प्रवृत्ति कशी चालली-
आहे हें तुह्मी पहावें. जेव्हां ख्रीस्तीशास्त्र विभागांची प्र-
सिद्धि झाली तेव्हां त्यांची साक्ष पाहून त्यांविषयींचा प्रा
माण्यग्रह होऊन लोकांनीं त्यांजवर विश्वास ठेविला.
ज्यानीं ख्रीस्तीशास्त्राविषयीं साक्ष दिल्ही त्यांची परिक्षा
वैऱ्यानीं घेतली तेव्हां ते सत्यवादी दिसले. येशू ख्रीस्ता
नें त्यांच्यागोष्टीप्रमाणें वर्तणूक केली ह्या बोलण्यामुळे
त्यां

त्यांचा पाठलाग व हानी झाली तथापि त्यांनीं आपलें कृ
त्य तटाकितां राजासमीप मरणादिक भय धरून बोलाया
स किमपि भयभीत झाले नाहींत · त्यांचें कथन ध्यानां-
त आलें असतां कांहीं संशय मनांत राहणार नाहीं · जे-
ख्रीस्ती उपदेशक विद्यमानीं मुंबईतील प्रांतीं आहेत ते हें
प्रगट करायास सिद्ध आहेत · ह्याविषयींचा विस्तार कर
ण्यास ते समर्थ आहेत परंतु ग्रंथ बहुल्य होईल ह्मणू
न सूचिप्रदर्शनमात्र केलें · याविषयीं बहूत करून थो
ड्याच दिवशीं दुसरा ग्रंथ प्रसिद्ध होईल · ✻

हिंदु देवाचे गुण अवतार यांविषयींचा विचार मा
गील कथनीं झाला इतःपर भट्टानें ज्या गोष्टी मूर्तिपूजना
विषयीं लिहिल्या आहेत त्यांचा आतां विचार करितों · ही
गोष्ट मोठी आहे कां कीं केवळ एकच देव मानावा हें मा
त्र अगत्य आहे असें नाहीं · तर ज्यांचा गल्या योग्य रीती-
नें हें त्यांचें गौरव प्रगट होईल आणि त्यांचे गुण ह्मणजे
महात्म्य ज्ञान निराकारित्व पराक्रम पवित्रता औदार्य-
त्व इत्यादिक ध्यानांत येतील त्या रीतीनें भजनार्चनें
व्हावीं ·

(१) भट्टानें असें लिहिलें कीं "हिंदुलोकांत कोणी ए
कही असा नाहीं कीं जो मूर्तीस देव मानितो" जर ह्या गो

ष्टी

गोष्टीवर विश्वास ठेवण्यास शक्तिमान असतों तर मी फा
र उल्हासित होतों · परंतु जें प्रतिदिवशीं घडतें त्यापासू
न आमचा निश्चय होतो कीं जें भट्टानें सांगितलें तें मि-
थ्या आहे · हिंदुलोक मूर्तीस देव मानित नाहींत असे थो
डेसे आहेत · परंतु मानणारे लक्षावधि आहेत · सर्व ग्रा
म नगर कसबे सुभा यामध्यें व सर्व जाति व स्त्री पुरु
बालक यामध्यें असें मानणारीं बहुत मिळतात · मूर्तीस
देव ह्मणतात आणि देवाप्रमाणें त्यांची सेवा करितात ·
आणि असें करावयास ब्राह्मण उपदेशितात · ह्यांत त्यां
ला कांहीं लज्जा कधीं वाटत नाहीं · आणि कोणी स्न
र्यां उष्ण निवारणार्थ पंख्यानें त्यांवर वायु घालितात व
सीत निवारणार्थ प्रावर्ण घालितात · मुर्कुटादिकीं दंश
न करावा ह्मणून पडदे ठेवितात · त्या चांगल्या दिसा
व्या ह्मणून गोंडास व सर्वशरीरास शेंदूर लेपन करिता
त · आणि त्यांस स्वच्छपणा होण्यासाठीं आंदोळीं घालू
न आंदोलन करितात · स्वप्नांत सुचिन्ह दुश्चिन्हें समज
ण्यांसाठीं त्यांची प्रार्थना करितात · आणि जन मनोर
थ पूर्ति होण्याविषयीं एकाच देवाचें मूर्तींच्या ठायीं -
बलाबल मानितात · आणि यवनादि अटराटोपीकर
यांचा स्पर्शास्पर्श नव्हावा ह्मणून बंदोबस्त ठेवितात ·

आ-

आणि कदाचित स्पर्श झाला असतां देव बाटला त्याचें
देवपण गेलें त्यास शुद्ध करणें प्राप्त आहे इत्यादिगोष्टी सां
गतात. त्यांस रोग झाला असें समजतात. मंत्रावांचून मू
र्ति व्यर्थ आहेत असें भाषण ब्राह्मणापासून ऐकतात.
यांविषयीं मोरभट्टाच्या ग्रंथीं आधार आहे तो लिहितों.
" मंत्रेंकरून यथाशास्त्र ईश्वराचें आवाहन मूर्तीच्या
ठायीं केलें असतां निराकार ईश्वरास एक अव्यक्त कल्पि
त देह उत्पन्न होतो. देह झाला ह्मणजे त्यास देहवानासा
रिखे उपचार जेजे यथाशास्त्र द्यावे तेसर्व पोचून संतोषी
होतो. "ज्याचें लक्ष अहर्निश त्या आकाराकडे लागलेलें
असतें त्यास तो ईश्वराचा आकार प्रत्यक्ष होतो." बं-
हुत हिंदुलोक एवढे मूर्ख आहेत कीं ते मूर्तिस देव मानि
तात हें निश्चय स्पष्ट आहे. त्यांचे शास्त्रांमध्यें याविषयीं
फार व्यत्यय आहे. तंत्रसारामध्यें असें आहे कीं जो मु
र्तिस देव मानितनाहीं तो निश्चय नरकांत बुडेल. कांहीं
जागीं असा श्लोक आहे कीं.

मृच्छिलाधातुदार्वादि मूर्तावीश्वरबुद्धयः ॥
क्लिश्यंति तपसा मूढाः परां शांतिं न यांतिते ॥ १ ॥

अर्थ — जे मृत्तिका पाषाण धातु काष्ट इत्यादिकांच्या मूर्ती
च्याठायीं इश्वरबुद्धि करित आहेत ते केवळ तपकरून

मू

मूर्ख होत्साते क्लेश पावत आहेत जी परम शांति ती त्याला
प्राप्त होतनाहीं. कोणें ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं
"मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होऊन स्थापना झाली ह्मणजे ति-
चा धातूपणा राहतनाहीं" कोणें अन्यठिकाणीं असें आ
हे कीं "मूर्तीमध्यें देवपणा कधींहि नाहीं" अशी वैपरित्या-
चीं कारणें मला सांगवतनाहींत. परंतु हिंदुलोकांत प्रा
रंभापासून मूर्तिपूजन नव्हतें असें मला दिसतें. निराका
र देवाचे भजनाचा जेव्हां त्याग केला तेव्हांपासून सूर्य
चंद्रादिकांचें पूजन लोक करूं लागले असतील. ही पूजा
वेदामध्यें विशेष आहे. आणि जें मूर्तिपूजन ह्यापेक्षां का
हींसें नीच तें पुराणामध्यें विशेष आहे.

२ मूर्तिपूजन स्थापनार्थ भट्टानें असें लिहिलें आहे
कीं "ईश्वर आहे असें जरी ठाऊक असलें तरी तो को
ठें दिसत नाहीं. पापकेलें असतां तो कोणाचे यालोकीं शा
सन करितो असेंही अनुभवास येतनाहीं." असें याचें का
रण सांगतो. परंतु त्याचें निरर्थकत्वप्रदर्शनार्थ दोनप्रश्न
मी करितों. दगडेंकरून देवदिसतो कीं काय ? आणि द
गडेंकरून तो यालोकीं शासन व पापाचें नियमन करि
तों कीं काय ? ज्याला वेडलागलें नसेल तो असें बोल
णार नाहीं ? देव ह्यालोकीं आपल्या कृत्यानें आपलें गो

र

रव व आपला पराक्रम सत्व ज्ञान विश्वासित्व प्रगट करि
तो. तो पापामुळें कांहीं दंड लावितो. पाप केलें असतां म
नांतील शांति जाऊन भय इत्यादिक वाईट विकार उत्प
न्न होतात. आणि पापामुळें दुःख रोग मरण इत्यादि पी
डा जगांत आल्या. देव आपल्या ग्रंथीं ही आपली गोष्ट
मनुष्यांसाठीं प्रगट करितो आणि देवाच्या शब्दामध्यें ब-
हुत पराक्रम आहे हें भट्टाच्या मतावरून स्पष्ट दिसतें. तें
असें कीं "राजानें एक आज्ञापत्र पाठविलें त्यांत लिहिल्या
प्रमाणें केल्यास फळ होतें न केल्यास होत नाहीं. तसेंच
ती आज्ञा ऐकतांच सेवकांच्या मनांत हर्ष शोक भय इ
त्यादिक जे कांहीं विकार व्हावयाचे ते होतात. ते विका
र कोण करितो याचा विचार करा. जर राजा करितो म्ह-
णावें तर राजा तेथे आला नसतो राजाची आज्ञा ही कांहीं
राजा नव्हे तस्मात् त्या आज्ञामध्यें कांहीं विलक्षण शक्ति
आहे." असें असतां जो मूर्तिपूजा करितो तो बहुत अप
राधी जाणावा. जें वर्णन देव आपल्या कर्मानीं करितो त्यां
वर त्यानें डोळे मिटले. जो पापमूलक दंड देव लावितो-
तो त्याच्या ध्यानांत येत नाहीं. ज्या गोष्टी देव आपल्या ग्रं-
थीं प्रगट करितो त्याजवर तो मन लावित नाहीं. आणि
निरुपयोगी साधनें कामांत आणितो आणि या साधनानें
पा

पापाचा प्रतिबंध देव करितो असें तो म्हणतो. अरेरे मनुष्या
च्या हृदयांत काय कुत्सित कल्पना प्रवेश करितात.

३ मूर्तिपूजा स्थापनेविषयीं भट्ट असें लिहितो कीं "अ
से नियम ज्यांच्या धर्मांत नाहींत त्यांचा आचार व कर्में पाहा
वीं म्हणजे समजेल कीं या मूर्तिपूजादिकांचा उपयोग आहे
कीं नाहीं." असा शोध करावा आणि जर देवळांतील व बा
हेरील आचाराविषयीं शोध होईल तर बरें. ख्रीस्ती लोक
मूर्तिपूजित नाहींत परंतु ख्रीस्तीमंडळींत येऊन भजन क-
रितात त्याचे गुण कर्में व उपकार प्रीतीनें व भिडेनें ध्या
नांत आणून देवाचें भजन करितात. जितकीं त्यानीं पापें
केलीं असतील तितक्यांचा अंगिकार करितात. पापाची
क्षमा मनाची शुद्धता ज्ञान शांति आनंद प्राप्त होण्यासाठीं प्रा
र्थना करितात. आपला मित्र आपण व सर्व लोक यांस आ
शीर्वाद प्राप्त करिता विनंती करितात. ज्या जाग्यामध्यें दे
व आपलें गौरव प्रगट करितो त्यांतील जें आत्याच्य सार्व-
कालिक सुख तें प्राप्त होण्यासाठीं प्रार्थना करितात. देवा
च्या ज्या गोष्टी त्यामध्यें त्याचे गुण माणसाची अवस्था उ
द्धाराचा मार्ग मनुष्यकर्तव्यता इत्यादिकांचें वर्णन केले-
लें आहे त्याचें श्रवण करितात. या साधनानें व देवाच्या
आशीर्वादें करून पवित्र आत्म्याच्या सहायतेकडून त्या
चें

चें ज्ञान विश्वास व प्रीति वाढवितात. त्यांची आशा पूर्ण
होती व जो पापाचा द्वेष त्यांच्या मनांत आहे याची वृद्धि हो
ती. हिंदुलोक कसें करितात हें पहावें देवतांचें भजनपू
जन असें करितात कीं प्रारंभीं आपलें पाप जावें ह्मणून सं
कल्प केल्यावर शंख घंटा धारण व ध्यानादिककरून षो
डशोपचार पूजाकरितात. दधि पय घृत मधु शर्करा इ
ही पंचामृतपूजन झाल्यावर वस्त्रार्पणकरून चंदन पुष्प
माळा देवास वाहातात. धूप दीप नैवेद्य अर्पून नारळीफ
ळ विडा दक्षणा प्रदक्षणा व मंत्रपुष्पांजलि केल्यावर भ
जन करितात. कोणी बोकडाच्या शब्द करितात. को-
णी उदेव उदेव कोणी एलकोट एलकोट कोणी ज्ञानराज
माउली तुकाराम ज्ञानेश्वर माउली कोणी हरिहर कोणी
राम सीता असे शब्द करितात. आणि ताल वीणा मृदंग
झांज वाजवून नाचावें उडावें फेऱ्या घालाव्या. व गळयांत
तुळशीकाष्टमाळा घालावी असें करितात. याप्रमाणें ग
र्व धरून आपल्या मनाला फसवून देवाच्या अपमान क
रून आपल्या आत्म्यास उपद्रव करितात. खरे ख्रीस्तीलो
क ज्यावेळीं देवळांतून आहेत त्याकाळीं योग्य आच
रण करितात. देवाचें भय धरून आपल्या कुटुंबामध्यें सं
त्यनेनें व आत्म्यानें भजन करितात. आणि सर्व कामांत
य

यथार्थ न्याय आहेत. त्यांच्या देशामध्यें ज्ञान विद्या व स
रूपता मूर्तिपूजकांपेक्षां विशेष आहेत.

४ भट्टानें असें लिहिलें आहे कीं "मूर्ति सारखा ईश्वर
आहे असें कोणी मानित नाहींत परंतु उगीच तशी कल्पना
करून प्रतिदिवशीं त्याच्या आराधनेंत कांहीं वेळ घालविला
असतां त्यापासून मनास शांति होत्ये. असें होतां होतां पु
ढें वास्तवीक ईश्वराचें ज्ञान झालें आणि संसारापासून
विरक्तता मनास झाली ह्मणजे आपाप कर्मांचा उपयोग
नाहींसा दिसोन तीं सुटतात." ह्या बोलण्याच्या प्रारंभीं
जें मनास वाईट त्याविषयीं भट्ट कबूल होतो. जरी हिंदुलो-
क मूर्तिसारखा देव आहे असें मानित नाहींत तरी उगीच
तशी कल्पना करितात! हें काम भगवंतास संतोषित क
रण्यासाठीं व त्यांचे महात्म्य गौरव उत्कृष्टता दाखवण्या
साठीं असें ह्मणतात! देवाविषयीं व्यर्थ कल्पना करून
त्यांस शांति प्राप्त होत्ये असें ही ह्मणतात. ही शांति कशी
आहे हें कांहींच सांगितलें नाहीं. कीं भ्रांतिपासून होती
किंवा ही भ्रांतीच आहे याविषयीं संशय नाहीं. ज्यासू
र्तीस ईश्वरासारिखा मानीत नाहींत त्यांपासून वास्त-
वीक ईश्वराचें ज्ञान प्राप्त होईल असें कां सांगितलें आ
हे? अशा कामानें संसारापासून विरक्तता कशी होई
ल?

ल? कीं ज्या दगडाला देव असें नाम दिल्हेंलें आहे त्याचें
दर्शन करण्यानें एवढी भ्रांति माणसांच्या मनामध्यें उठे
ल कीं आपल्या पोषणार्थ आपल्या हस्तानें उद्योग करणा
र नाहींत परंतु भिक्षुकांसारिखे रस्त्यावर हिंडून दुसऱ्या
पाशीं मांगतील अथवा वनवास करून आपला आत्म
नाश करतील. "बहुतानीं असें केलें ही आहे." परंतु हिं
दुलोकांत विद्येची वृद्धि झाली ह्मणजे असें करणें बंद हो
ईल." तशी योग्यता नसतां उगीच तोंडानें ज्ञान सांगितलें
आणि मनास येईल तसें वागलें तर त्यापासून काय हो-
णार आहे. जर मूर्तिपूजेंत आणि शरिरादिकांच्या नियमां
त कांहीं नाहींतर नुस्त्या बोलण्यांत तरी काय आहे." उ
त्तर मोरभट्टाच्याच ग्रंथीं मिळेल. तें असें कीं "शब्दामध्यें
बहुत पराक्रम आहे." जे उपदेशक ठीक वागत नाहींत
त्यांपासून कांहीं होणार नाहीं परंतु ठीक वागणारे असे
ख्रीस्ती धर्मांत बहुत आहेत.

५ भट्टानें असें सांगितलें आहे कीं ". अपवित्र विषयां
पासून मनास सोडावयाची ही युक्ति योजिली आहे कीं ई
श्वराचा चतुर्भुजादिक आकार ध्यावा तेणेंकरून मना
चें वाईट चिंतन जातें. तसेंच खटपट केल्यावांचून म-
नाला रहावत नाहीं ह्मणून मनास पूजेची खटपट ला-

विली आहे." या बोलण्यानें मूर्तिपूजेचें स्थापन होत नाहीं.
अदृश्य पदार्थीं मनप्रवेश होतो ह्मणजे त्यांचें वर्णन व का
में यांविषयीं कल्पना करायास मन शक्तिमान आहे. तस्मात्
त्याचा देवापर्यंत प्रवेश नाहीं ह्मणून मूर्तिस्थापाव्या अ
सें कोण ह्मणेल? यासाठीं चतुर्भुजादिक आकार कां करा
वा? जरी देवास रूप व प्रतिमा नाहीं तरी मन त्यावर जा
वयास शक्तिमान आहे. जे गुण त्याच्या कामानें प्रदर्शि
त आहेत त्याची गोष्ट आज्ञा नियम वचन पोषण पालन
राज्य भक्त यांविषयीं मनाच्यानें कल्पना करवते. जी
मनुष्य संबंधीं सर्वांहून वाईट मूर्तिपूजेविषयींची जी गो
ष्ट ती हीच कीं मुख्य उद्देशांत सर्वदां मन असावें आणि
ज्यास पाहिलें नसतां पाप होतें त्यावांचून मनाला आधा
र मिळतो. देवाच्याठायीं खऱ्या भक्तांस मात्र आधार मि
ळतो. चतुर्भुजादिकांचा उपयोग काय? यांपासून काय
ज्ञान मिळेल? हस्तामध्यें शंख चक्र गदा पद्म हीं चार आ
युधें आहेत. असे हलके पदार्थ त्यास कशाकरितां पाहिजेत?
हीं भ्रांतिवांचून पाहायास कोण शक्तिमान होईल. विष्णु दुष्ट अस
तां तो गदा चक्रेंकरून भक्तांस मारणार नाहीं असें लोकांच्या मनां
त येईल कीं नाहीं? त्यांला चार हात असें कां सांगतात.
तर चार हजार कां सांगत नाहींत? आणि त्यांतून चार हजा

र आयुधें आहेत असें कां सांगत नाहींत ? असे प्रश्न करण्यानें भट्टाचें बोलणें उपहासक दिसूं लागतें. त्याचा पूर्ण निश्चय होण्याकरितां भागवतांतील श्लोक लिहितों.

विषयान्ध्यायतश्चित्तं विषयेषु प्रसज्जते ।
मामनुस्मरतश्चित्तं मामेव प्रविलीयते ॥ १ ॥

ह्मणजे चित्त जें तें विषयांतें ध्यान करित होत्सातें विषयांच्या ठायींच युक्त होतें. तसें मला स्मरणारें चित्त जें तें मातेंच उत्कृष्टत्वें करून लीन होतें. ही गोष्ट कृष्णानें सांगितली असें सांगतात. याप्रमाणें पाषाणाकडे मन लाविलें असतां पाषाणवत होईल.

मूर्तिपूजादि व्यवहारापासून मनाला दुष्टता मात्र उत्पन्न होती परंतु दुष्ट व्यवहारापेक्षां आलस्य बरा आहे. स्वकीय कर्त्याच्या ठिकाणीं दगडाची आराधना करण्यापेक्षां वानरासारख्या क्रीडा करणें चांगलें काम आहे. ही गोष्ट भट्टाच्या मनांत याची आणखी त्यानें समजावें कीं जें मन चंचळ आहे तें मूर्तिपूजा करायास हिंदुशास्त्रें देत नाहींत. ही गोष्ट ठसायासाठीं श्लोक लिहितों.

सदाशुचिः सदा नम्रो इंद्रियनिग्रहीच यः
यश्च सुस्मरणयुक्तो वेदशास्त्रविचक्षणः ॥ २ ॥
शीलादिगुणसंपन्नो यश्चैवास्ति सुबुद्धिमान् ·

ते

तेन नियमाः कर्तव्याः केनाप्यन्येन नैवच ॥ २ ॥

अर्थ. जो नित्य पवित्र नम्र इंद्रियदमन करणारा आणि जो उत्तम स्मरणयुक्त वेदशास्त्रामध्यें विचक्षण सुशील इत्यादि गुणसंपन्न आणि ज्याची बुद्धि चांगली असा जो आहे त्यानेंच नियम करावे दुसरे कोणीही करूं नये ॥ या श्लोकाचें नीट मनन करावें. परंतु कंठाच्या ठायीं पाषाणबंधन करून पापसमुद्रांत बुडावें ह्मणून ब्राह्मण अज्ञानी लोकांस सांगतील कीं काय?

५ मूर्तिपूजेनें पुण्य होतें याचें प्रमाण दाखविण्यासाठीं मोरभट्ट यत्न करितो: "याला शास्त्रप्रमाण आहे" असें सांगतो. कदाचित् हिंदुशास्त्रांत प्रमाण असेल परंतु याच कारणावरून तीं देवापासून नव्हत असा निश्चय होईल. ब्रह्माचे शब्द अप्रमाण ह्मणावे हें मागें प्रदर्शित आहे ह्मणून त्याविषयीं बहुत एथें लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. मूर्तिपूजेविषयीं जी युक्ति भट्टानें लिहिली आहे तिचा विचार करावा. ती अशी कीं: "पुण्य हें ईश्वरास संतोष झाला ह्मणजे उत्पन्न होतें तो संतोष व्हावयास पूजादिक साधनें होय." पुण्योत्पत्तीच्या कारणाविषयीं माझें व मोरभट्टाचें मत यामध्यें कांहीं वैपरीत्य असेल. ज्यामुळें देवानें वरप्रदान करावें त्यालाच मी पुण्य ह्मणतों. असा अर्थ

लाऊ

लावून मी ह्मणतों कीं मनुष्यांच्या कर्मामध्यें कांहीं पुण्य
नाहीं. त्यांच्या सर्व कर्मामध्यें पाप मिसळलेलें आहे. आ
णि मनुष्य सेवेपेक्षां देवाचीं देणीं व दया मोठीं आहेत.
मूर्तिपूजेनें देव संतुष्ट होतो याचें प्रमाण मोरभट्टानें कां-
हीं लिहिलें नाहीं परंतु या दृष्टांतांत उलटी होती." त्यानें असें
लिहिलें कीं जसें दूर देशीं कोणी ग्रहस्थ आहे किंवा स्व
देशीं आहे त्याचें नाव दुसऱ्या कोणास ठेवून अथवा ना
व नठेवितां उगीच त्याचा उद्देश कल्पून जर अन्न वस्त्र
इत्यादिक दिलें तर त्या मूळपुरुषास होईलच." ह्या दृष्टांता
वरोन स्वदेशांतील मनुष्यें हंसुलागलीं हें मी पाहिलें आ
णि तीं निरर्थक हंसलीं नाहींत. गोष्ट अशी कीं देव मनु-
ष्यांपासून सेवा घ्यावयास इछितो परंतु तीं दुसऱ्या प-
दार्थांस त्याचें नाम देऊन पदार्थांची सेवा करितात. बु
द्धिमंत लोकांस असें मीं विचारितों कीं देव अशानें संतो
षित होईल अथवा नहोईल? निश्चय संतोषित होणार
नाहीं. जें त्याचें आहे तें दुसऱ्याला दिलें ह्मणून क्रोधयुक्त
होईल. देवाचें नाम देवाला द्यावयास योग्य असतां जर
अन्याला दिलें जाईल तर जो भेद देवसंबंधीं आणि जीव
संबंधीं तो लोकांच्या मनांत येणार नाहीं आणि देवाचा
सन्मान दारवविला जाणार नाहीं. पृथ्वींतील राजाही प्रजे

ला असें करायास देणार नाहीं मग ईश्वर कोठून देणार?
ज्या ग्रहस्थाला दुसऱ्यानीं अन्न वस्त्र इत्यादिक दिलीं पाहि
जेत त्याला नदेतां जर दुसऱ्यास देईल तर तो क्रोधी होणा
र नाहीं कीं काय? तसें देवाचें भजन करावें तें नकरतां
त्याचें नाम दुसऱ्यास ठेऊन त्याला भजतील तर देव संतो
षित होईल कीं काय? याविषयीं एक उपमा देण्यास बं-
गाल्यांतील पुस्तकांत मिळाली आहे ती सांगतों. जर तु-
मचा चाकर तुह्मीं सांगितलें काम अव्हेरून नदींतिरीं जाऊ
न एक मृन्मय मूर्ति करून तिला धनी असें नाम देऊन सर्व
दिवस उदक अक्षता इहीं करून तिची सेवा करील आणि
सायंकाळीं येऊन तुह्मापाशीं वेतन मागेल तर तुह्मी द्याल
कीं काय? तर नाहीं देणार. आणि तूं भ्रष्ट आहेस कीं का
य? असा निषेध करून त्याला चाकरीपासून दूर कराल
याप्रमाणें जे मूर्तिपूजक आहेत त्यानीं समजावें कीं देवलो
कीं जाण्याचा मार्ग नमिळतां निरास होऊन नरकप्राप्ति मा
त्र होईल.-- जो दृष्टांत मोरभट्टानें दगडांस पायपोस मारण्या
विषयीं सांगितला तो भजनविषयक नसतां कां त्यानें सां
गितला तें मला सांगवत नाहीं.

६ मूर्तिपूजास्थापनेविषयीं मोरभट्टाला फार अडच
ण पडली असें मला वाटतें. त्यानें सांगितलें कीं "रा

ज्ञाने एक आज्ञापत्र पाठविलें त्यांत लिहिल्याप्रमाणें केल्या
स फळहोतें नकेल्यास होतनाहीं. तसेंच ती आज्ञा ऐकतां
च सेवकाच्या मनांत हर्ष शोक भय इत्यादिक जे कांहीं वि
कार व्हावयाचे ते होतात. ते विकार कोण करितो याचा वि
चार करावा. जर राजा करितो ह्मणावें तर राजा तेथें आ
का नसतो राजाची आज्ञा हा कांहीं राजा नव्हे तस्मात् त्या
आज्ञामध्यें कांहींविलक्षण शक्ति आहे." "जेव्हां लौकिक श
ब्दांमध्यें शक्ति आहे तेव्हां अलौकिक प्रामाणिक जो शब्द
त्यामध्यें शक्ति आहेच. यामध्यें मंत्रें करून यथाशास्त्र ई
श्वराचें आवाहन मूर्तीच्याठायीं केलें असतां निराकार
ईश्वरास एक अव्यक्त कल्पित देह उत्पन्न झाला ह्मणजे
त्या देहास देहवासनासारिखे उपचार जेजे यथाशास्त्र
द्यावे ते सर्व पोंचून संतोषही होतो." हें सर्व ह्मणायाचें
मात्र आहे ह्यामध्यें कांहीं प्रत्यक्ष नाहीं ही गोष्ट भट्टानें
आपणास स्वधर्मास उपद्रव करण्यासाठीं काढली कीं काय?
राजाच्या आज्ञापत्रांत बहुत पराक्रम आहे याविषयीं सं
शय नाहीं परंतु मंत्र राजापासून प्रजांस आज्ञापत्र नाहीं
तर हा प्रजेपासून राजासाठीं आहे हें समजावें असें अस
तां तो चालेल कीं काय? भट्टाला हा श्लोक ठाऊक असे
लकीं.

हे

लिहिण्याचें कारण नाहीं. ब्रह्मा विष्णु शिव राम कृष्ण
यांजवर अतिपाप भासतें हें मागें प्रदर्शित झालें आ
णि सर्व दुसरे हिंदु देवांवर पाप भासतें याचें प्रमाण
दाखवायास कांहीं अडचण नाहीं. असें असतां सं
पूर्ण लोकांस माहित होतें कीं जी हिंदु देवांस रूपें सांग
त असतात त्यांस भगवान कधींहि ग्रहण करणार ना
हीं. त्यांचें दर्शन झाल्यास त्यांच्या वर्णनाचें स्मरण कां
हींसें पडेल परंतु स्मरण पडल्यावर काय? यापासून
मन मात्र अपवित्र कल्पनेनी भरेल. भट्टाला ठाऊक आ
हे कीं अपवित्र विषयापासून केवळ अपवित्रता उत्प
न्न होती. हिंदु मूर्तिकडे मनाची योजना केली असतां
एक्या देवाचें ज्ञान होणार नाहीं असा सिद्धांत होतो.
ज्या मूर्तिंची प्रवृत्ति आहे त्यांस पाहाण्यानें भीडेपेक्षां उ
पहास सहज प्राप्त होतो आणि सुखाच्या ठिकाणीं कं
टाळा येतो. त्या कशा आहेत हें पाहावें. त्यां उपहासक आ
हेत. ज्या गणपतिला मोठें पोट व हत्तीचें शीर आहे
ज्या विष्णु शिवादिकांचीं गदा चक्र नरकपाल इत्या
दि भूषणें आहेत ज्या देवीला मार्जाराचे डोळे व वाघा
चे दांत आहेत ज्या ब्रह्म्याचें वाहन हंस आहे यांपासून
आणि अपवित्र लिंग व देवपदें गायी वांनर यांपासून दे

वा

... Oriental MSS. Library, Triplicane P.O., Mad...

यावर प्रीति व त्याचें आज्ञेसाठीं भीड आणि पवित्रता
व ज्ञान हीं प्राप्त होतील काय? यावरून असें होतें कीं
मूर्तिपूजा केवळ भ्रमदायक आहे.

मुसलमान लोकांचें आचरण व नियम त्यानीं आ
णण्यानें आपली गोष्ट सिद्ध व्हावी असा मोर भट्ट यत्न क
रितो. तथापि त्याचा यत्न व्यर्थ आहे "मुसलमान एक
ईश्वर सांगतात. आणि ज्यापुरुषानीं कांहीं चमत्कार के
ले त्यांजवर विश्वास ठेवितात्" याच कारणामुळें ख्रि
स्ति उपाध्ये व लोक त्यांवर दोषारोप करितात्. कीं भ
गवान त्याला पुरत नाहीं आणखी ज्याठिकाणीं भगवान
मनुष्यास मानींत नाहीं त्याठिकाणीं त्यापुरुषांस ठेऊ
न देवाचा अपमान करितात. हें सर्वांस स्पष्ट दिसतें.
यावरून हिंदु लोकांचीं कामासारिखीं मुसलमानाचीं
आहेत असें जरी आहे तरी दोघांचीं दुष्ट आहेत.

ज्या गोष्टी ख्रीस्ती धर्मापासून भट्ट स्वमत स्थापना
र्थ काढितो त्यांहीं त्यास सहायभूत न होतां तद्भंग जनक
होतात. पिता पुत्र पवित्रआत्मा यांचीं गुण कर्म व अस्ति
त्व यांमध्यें आणि राम कृष्ण ब्रह्मा विष्णु शिव इत्यादि क
ल्पित हिंदु देव याचें गुण कर्म अस्तित्व यांच्यामध्यें बहु
त तीरतम्य आहे म्हणून मागे विस्तारानें कथित आहे.

ख्रीस्ती धर्मसंस्कार आणि मूर्तिपूजा यामध्यें जें साम्य
आहे यावरून असें किंचित् दिसणार नाहीं कीं मूर्तिपूजे
मध्यें बहुत पाप नाहीं. यांतील मुख्य गोष्टींमध्यें काय
साम्य आहे? ज्यामूर्ति हिंदु आराधनेंत कामास पडता
त आणि जें पाणी व द्राक्षरस ख्रीस्ती धर्म संस्कारामध्यें
मिळतात यांविषयीं उभयतांच्या मनांतील लोकसांग
त असतात तें पहावें. याविषयीं समजावें कीं हिंदुलोक
मूर्तिपूजितात व ख्रीस्तीलोक भाकर व द्राक्षरस यांचें
पूजन करित नाहींत तरीं ख्रीस्ताचें जें शरीर पापिष्ट लो
कांसाठीं मोडलें आणि रक्त ओतलें त्यांचीं हीं ज्ञापकें आ
हेत. ज्याचें भजन होतें आणि जें भजनांत मात्र स्मरण आ
हे यांमध्यें बहुत वैपरित्य आहे. कीं मूर्तिपूजेमध्यें पुण्य
आहे असें हिंदुलोक सांगतात परंतु ख्रीस्तीलोक असें
म्हणतात कीं आमचें सर्वपुण्य येशुख्रीस्तापासून आहे.
राम कृष्णादिकांचें कथन जे जाणतात ते त्यांच्या मूर्ति
पाहून त्यांचें स्मरण कदाचित पडेल पण स्मरण पडलें
म्हणून काय? राम कृष्ण देवसंबंधीं नाहींत. अतिपा
पी आहेत असें त्यांच्या क्रिया व वर्णन यांवरून दि
सतें. चोर लबाड व्यभिचारी हत्यारी त्यांच्या भजन
मननानें बहुत बुद्धीस भ्रंशमात्र होईल. ख्रीस्त देव

आहे त्याला सर्व चांगले गुण आहेत. त्याच्या गोष्टींनी देवाचें गौरव व उद्धारमार्ग इत्यादि प्रसिद्ध होतात म्हणून त्याची भजन मनन हीं आवश्यक आहेत. जशीं नियमित भाकर पाणी द्राक्षरस यांणीं खरे भक्तांस येशूख्रीस्ताच्या कर्मांचें व सोसण्याचें ज्ञापन होतें आणि त्यांचें स्मरण पडतें तसा ख्रीस्तीधर्मसंस्कार बहुत उपयोगी आहे असें समजावें. देवानें लोकांस तारण्यासाठीं आपला पुत्र दिला यामध्यें जी प्रीति दाखविली आहे येशूख्रीस्त स्वप्रीतीनें लोकांच्या ठिकाणीं होऊन त्यानें पापाचा दंड भोगिला आणि प्रायश्चित्त केलें यामध्यें देवाची जी पवित्रता व न्याय पापाचें वाईटपण आणि लोकांच्या आत्म्याचें मोल दाखवलेलें आहे तीं सर्व संस्काराकडून ध्यानांत येतात. ज्या एकाला बाप्तिस्मा असें नाम दिल्हें आहे आणि ज्यामध्यें शरीरावर पाणीं घातलें जातें त्यानें मंडळींत शिष्याचा प्रवेश होतो. ज्याला प्रभूचें भोजन असें नाम दिल्हें आहे आणि ज्यामध्यें खुणेसाठीं थोडासा द्राक्षरस व भाकर घेतात त्यामध्यें कसी प्रीति व ममता भक्तांमध्यें असावी हीं दाखवलीं जातात.

जो हिंदुमनुष्य देवांची गौरवयुक्त कर्मे सोडून

"खो

खोली बंद करून पुढें एक लहानसा मांखलेला दगड किंवा धात्वादि पदार्थांचा तुकडा घेऊन देव देव करीत बसतो" याच्या कामांत अतिमूर्खत्व दिसतें. तो देवाचा वंश असतां त्यानें असें न कल्पावें कीं सोनें अथवा रुपें अथवा धोंडा माणसांनें केलेलें व युक्तिनें करिवलें यासारिखें देवपण आहे? देवाचे गुण कर्मे व अनुग्रह दगडापासून प्रसिद्ध होतनाहींत आणि यापासून कांहीं ज्ञान प्राप्त होतनाहीं. तर यापासून भ्रममात्र होईल. जो ख्रीस्ती आहे तो देवाचीं कर्मे पाहून आश्चर्यांत स्तब्ध होतो आणि त्या कर्मांचें महात्म्य विस्तार असंख्यत्व समजून त्यांचें नित्य परिवर्तन आणि त्याचें गौरवयुक्त सुधारण ध्यानांत आणून यांमध्येंजें ज्ञान सत्य व विश्वास इत्यादि प्रसिद्ध होतात तीं पाहून तो त्यांच्या उत्पादक संरक्षक यांचे महत्वाचें स्तवन करितो हा ख्रीस्ती जेव्हां उद्धारणाराच्या नामानें जी प्रीति याच्या मरणांमध्यें प्रगट होती याच्या स्मरणार्थ भाकर व द्राक्षरस घेतो तेव्हां जे गुण देवाच्या कृत्यानें प्रसिद्ध होतात त्यांस असंभावित कांहीं करीतनाहीं. ज्या सांगितलेल्या ज्ञापकावरून देव पवित्र व महान् व कृपालु आणि दयावंत आहे असें व्यं

ज

जक होतें यांकडून कांहीं सेवा करितो. मूर्तिपूजेसारिखें निर्जीव पदार्थांचें भजन आणि जो देव नाहीं त्याला देवाचें नाम देणें आणि पापिष्ट खोटी आकाराविषयीं कांही व्यर्थ कल्पना आणि ज्यानें देव दगडामध्यें येतो असे मंत्र आणि माणसांच्या स्पर्शानें देव बाटतो यांविषयीं भय असीं ख्रीस्ती धर्मसंस्कारांत ईषनहीं नाहींत.

मूर्तिपूजेची योग्यता व उचितत्व ह्यांचें स्थापन भट्टाच्यानें होतनाहीं असें मागील कथनकावरून स्पष्ट होतें यामुळें मूर्तिपूजेवर बहुत दोष प्रक्षेप करणें आणि उक्त कारणावरून हिंदुलोकांस तिचा त्यांग करणें उचित आहे एवढें मात्र सांगावें लागतें. ख्रीस्ती शास्त्रांची उत्कृष्टता प्रमाण व पराक्रम दाखवण्यासाठीं यांतोन कांहीं गोष्टी काढितों." प्रभु जो तुझा देव याजवर आपल्या संपूर्ण हृदयानें आणि आपल्या संपूर्ण जीवानें आणि आपल्या संपूर्ण शक्तिनें तूं प्रीति कर." "प्रभु जो तुझा देव याचें भजन तूं कर आणि त्याची सेवा मात्र कर." "मी प्रभु आहें हेंच माझें नाम आणि अन्याला मीं आपलें गौरव देणार नाहीं." "देव आत्मा आहे आणि जे त्याला भजतात त्यानीं आत्म्यानें व सत्यतेनें त्या

त्याला भजलें पाहिजे." "तूं आपणासाठीं कोरींव मूर्ति आणि जें कांहीं वरील आकाशांतील व खालील पृथ्वींतील व पृथ्वीच्या खालील पाण्यांतील ह्यांची प्रतिमा करूं नको." "परप्रजांतील लोकांची रीति तुम्ही नशिकावी कांकीं लोकांच्या रीति व्यर्थ आहेत. मनुष्यें अरण्यांत जाऊन कुऱ्हाडीनें झाड तोडून त्याची मूर्ति करितात म्हणून ती हस्तक्रिया आहे तिजवर सोन्याचीं भूषणें घालितात. तिचा तोल नजावा याजकरितां तातोडा वरिवळे यांहीं स्थिर करितात. त्या सरळ तांड सारख्या आहेत परंतु बोलत नाहींत आणि त्यांस उचलून न्यावें लागतें. अशाचें भय तुम्ही धरूं नका त्यांच्यानें बरें किंवा वाईट करवत नाहीं" "लोकांच्या मूर्ति सोन्या रुप्याच्या आहेत मनुष्यांच्या हस्तानीं केलेल्या आहेत. पाहा त्यांस तोंड असून बोलवत नाहीं आणि डोळे असून पाहावत नाहीं नाक असून वास घेववत नाहीं आणि हात असून चांचपवत नाहीं पाय असून चालवत नाहीं आणि त्यांस कंठारव होत नाहीं." "मूर्ति जे कोरितात ते सगळे शून्य आहेत आणि त्यांचीं जीं प्रिय तीं त्यांस लाभदायक होणार नाहींत. ते आपणाविषयीं साक्ष जरीं आहेत तरीं लज्जायमान व्हा

व

वयास ते पाहत नाहींत व समजत नाहींत. अनुप
योगीं देव कोणी कोरिला आणि मूर्त्ति कोणी ओतली?
पाहा त्याचे सगळे सहाकारी व कामकरी जीं माणसें
आहेत तीं सर्व लज्जित होतील. त्यां सर्वांनी समजावें.
त्यांनीं उभें राहावें. तें भय पावतील. ते एकत्र ल-
ज्जमान होतील. लोहार चिमटयानें (धातूला) कोळ
स्यामध्यें फिरवितो आणि हातोडयानें आकारास आ-
णितो आणि भुजांच्या बळानें रचितो. तोही क्षुधित
आहे तो बळहीन आहे पाणी नपितां तो अशक्त हो-
तो. सुतार आपला गज लावितो. (काष्टावर) रेघ काढि
तो रोंखणीनें यथास्थित करितो आणि त्यास मनुष्या
कृति करून मनुष्य सुरूपाप्रमाणें साधतो घरांत ठे
वावें ह्मणून. सुरूझाडें तो कापून पाडितो वनवृक्षां
तोन तिर्जा व साग आपल्यासाठीं निवडतो. ओरेन
झाड लावितो आणि त्यास पाऊस उपजवितो. म
ग मनुष्याचे साठीं दहन करण्यास योग्य होतें. त्यांतू
न घेऊन तो आपण शेकतो. आग करून तो भाकर
भाजतो. देवही करून भजतो. त्यांतोन कोरींव मू
र्ति करून तिच्या पायां पडतो. याचा एक विभाग घेऊ
न जाळितो आणि एक विभागें करून मांस खातो स्व

पाक करून भक्षून तृप्त होतो. आपण शेकून तो बोलतो कीं
मी अग्नि पाहिला. मग यांचें शेष घेऊन तो देव करितो ह्मणजे
आपली कोरींव मूर्त्ति. तिच्या पायां पडून भजतो व प्रार्थना
करितां बोलतो मला तार कां कीं तूं माझा देव आहेस. आ
णि कोणी आपल्या हृदयांत आणित नाहीं कोण्हाला अ
सें सांगायास ज्ञान व बुद्धि नाहीं कीं याचा एक विभाग म्या
अग्नीमध्यें जाळिला याच्या कोळस्यांवर भाकरही भाजि
ली स्वयंपाक करून भक्षून मी तृप्त झालों. मग याचें शेष
घेऊन मीं घाण करूं काय झाडाच्या बुंधाला नमूं काय"
अशा गोष्टी बुद्धीस व विवेकास प्रमाणिक दिसतात. ठी
क वाचून सगळ्या लोकांच्या मनांत येतील.:*:

जी भट्टानें तृतीय गोष्ट काढिली ती विश्वासाची-
आधार ह्मणजे देवानें लिहिलेलीं शास्त्रें यांविषयीं आहे.
त्यानें असें सांगितलें कीं "आह्मीं कांहीं कोणाचें मत खंडि
त नाहीं कां कीं या पृथ्वीवर सर्व लोकांकरितां जशी ईश्व-
रानें अन्नाच्छादनाची सोय योजिली आहे तसें त्यानें जा-
गां जागीं जे लोक आहेत त्यांच्या उद्धारार्थ भिन्न भिन्न म
तें सांगितलीं आहेत. ह्मणून ज्या मतांत ईश्वरास मानि
तात असें जेवढें मत तेवढें तें त्यांस खरें आहे त्या त्या
प्रमाणें तो ईश्वरापासून फळ पावतो" हा चमत्कारिक

उपदेश आहे आणि जो हिंदु धर्म कांहीं दुसऱ्या धर्माला मा
नित नाहीं; त्यास तो उपदेश विपरीत आहे. परंतु असें
केवळ भट्टाचेंच मत आहे असें नाहीं. या देशांतील पुष्क
ळ हिंदु मुसल्मान् व पारशी ह्याचेंही आहे. ख्रीस्ती ध-
र्म सर्वांपेक्षां उत्कृष्ट ह्यांत लोक प्रवेश करितील यामुळें
जें भय आहे तें मात्र मताचें कारण दिसतें. "ख्रीस्ती
धर्म सर्वांपेक्षां उत्तम परंतु आह्मासाठीं नाहीं" असें ब
हुत एतद्देशीय लोक बोलतात. परंतु असें नव्हे सर्व
लोकांसाठीं ख्रीस्ती धर्म आहे. केवळ एक धर्म आहे ए
तत् प्रतिपादण्यासाठीं संक्षेपानें प्रमाणें दाखवितों

धर्म स्थापकापाशीं धर्म शब्दार्थ पाहिला असतां
देवाचीं गुण नियम व कर्में आणि माणसाची कर्तव्य
ता व परिणाम यांचें वर्णन आहे. यावरून असें दिस
तें कीं ज्या रीतीनें धर्म प्रसिद्ध होईल त्या रीतीनें याची व
देवाची व माणसांची संभावना सत्यतेप्रमाणें असा-
वी यांविषयीं किंचित् संशय नाहीं. जें सतशास्त्र आ
हे त्यामध्यें देवाच्यानें आपले गुण कर्म व इच्छा व रा-
ज्य यांविषयींचें विपरीत निरूपण करववत नाहीं. मा
णसांचे सामान्य स्वभावाप्रमाणेंच देवाच्या आज्ञा-
होतील. सर्व लोक एकच रीतीनें या जगांत येतात आ

णि

णि जातात. जरीं त्यांचें कुटुंब पदवी यांविषयीं कदाचित्
अंतर पडलें तरीं मुख्यस्वभावाविषयीं कधींही अंतर
पडणार नाहीं. जे विकार मनोदय इच्छा एकाच्याठायीं
आहेत ते तसेच सर्वांच्याठायीं बहुत करून असतात. आ
णि बुद्धि चित्त यांविषयीं एक रीतीप्रमाणें आज्ञांकित आ
हेत. लोक अनेक स्थिति पावतात आणि ईश्वर आद्यंत
रहित एक स्थिति आहे. मनुष्यें नानाप्रकारच्या जाती
कदाचित् उत्पन्न करतील परंतु देव आपल्या राज्यापा-
सून आणि आज्ञापासून मोकळीं करील असें कदापि
होणार नाहीं. ह्यां कारणांवरून असें दिसतें कीं धर्मा
चे सिद्धांत सर्व ठिकाणीं एकच होतील.

धर्मांचीं उदाहरणें ध्यानांत आल्यानें असे अनु
भवास येतील कीं एक धर्म मात्र खरा आहे. ज्या धर्मांची
प्रवृत्ति जगांत चालत आली त्यांच्या सिद्धांतांत बहुत वै
परीत्य आहे. यांतोन कांहीं धर्म देवाची स्तुति आणि
कांहीं देवाचा अपमान प्रगट करितात. आणि कांहीं
ह्यांतोन एक देव व कांहीं बहुत देव मानितात. देवा
च्या गुणाविषयीं यांमध्यें बहुत अंतर पडतें. यांतोन
कांहीं एक ह्मणतात कीं देव प्रथम निर्गुण होता आ
णि कांहीं धर्म ह्मणतात कीं तो निर्विकार असतां त्या

ला

ला प्रारंभापासून सर्व चांगले गुण आहेत. कांहींच्यामतें
कीं देवाच्यानें पाप करवत नाहीं काहींच्यामतें असें
आहे कीं जरी त्यानें पाप केलें तरी त्याला पाप लागतना
हीं. कांहीं एकाच्या मतानें मूर्तिपूजेनें देव संतोषित होतो.
आणि कांहींच्या मतानें मूर्तिपूजेसारिखें दुसरें कांहींच
जगांत कुत्सित नाहीं. जगाची उत्पत्ति व स्थिति याविष
यींचें अनेक धर्मांमध्यें अनेकप्रकारचें वर्णन आहे. कां
हीं एकाच्या मतानुसार मनुष्यात्मा देव अंश आहे कांहीं
चें मत देवात्मा व मनुष्यात्मा अगदीं निराळा आहे. कांहीं
सांगतात कीं जन्मकालीं मनुष्य पापरहित आहे कांहीं
सपाप सांगतात. कांहीं जातिवर्ण मानितात कांहीं म्ह
णतात कीं सर्व एकापासून निर्माण म्हणून बंधुत्वामु
ळें अन्योन्य प्रीति असावी. कांहींची उक्ति आहे कीं मनु
ष्यापासून पुण्य होतें कांहीं देवाच्या कृपेकडून मात्र होतें
असें म्हणतात. कांहींच्यामतें मनुष्यास अनेक जन्म
होतात कांहींच्यामतें मरणानंतर अन्यजन्म होतनाहीं.
जितके धर्म आहेत तितक्याच्या मताप्रमाणें अनेक धर्म खोटे आ
हेत अशीं मतें असतां कधीं ध्यानांत येणार नाहीं कीं
सगळे धर्म आपले वर्तणारांस खरे आहेत. जीं विप
रीतें मतें शास्त्रांत आहेत तीं सर्व देव जो खरा आहे
या

यापासून आहेत असें कशावरून खरें म्हणावें? मोरभ
ट्टाच्या मताप्रमाणें देव खोटा व चंचळ आहे.

ह्यागोष्टी हिंदुधर्म व ख्रीस्तीधर्म यांस फारकरू
न लागतात. हे दोन्ही संक्षेपानें जरी ताडून पाहिले
तरी त्यांत अंधःकार व प्रकाश यांसारिखा भेद आ
हे म्हणून हिंदुधर्मावर आम्ही दोषप्रक्षेप केले आणि
करणार. उभय खरे आहेत असें कधींही घडणार
नाहीं. भट्टानें आपल्या मताविषयीं प्रमाण कांहींच
दर्शविलें नाहीं. जरी अन्नाच्छादनाचा त्यानें दृष्टां
त दिला तरी त्यानें समजावें कीं दृष्टांत आणि प्रमाण
यांमध्यें बहुत भेद आहे. जो दृष्टांत त्यानें सांगितला
त्याची प्रसक्ति येतनाहीं. अन्नाच्छादनापेक्षां धर्म ही
मोठी गोष्ट आहे. कांकीं जरी वेष बदला तरी अयोग्य
पण व पाप लोकांस प्राप्त होतनाहीं. आणि बहुतलोक
विचार केल्यावांचून असें करितात. ब्राह्मण पूर्वीं उ
ष्णीषादिक धारण करीत नव्हते परंतु हा वेष मुसलमा
नांपासून करूं लागले तसे अद्यापि पुढें कांहीं विपरीत वे
ष कशावरून नकरितील? जर यारीतीनें खऱ्या धर्मा
वर विश्वास ठेऊन वर्ततील तर परम उत्कृष्टता पा
वतील.

अगोधर मीं असें लिहिलें होतें कीं "देव सर्व लो
कांचा बाप· जो आपल्या लोकांस विपरीत नेंम देतो
तो बाप कशाचा? एकच नेम देवाने दिल्हा ह्मणून ए
कच खरा धर्म व एकच खरें शास्त्र आहे· जसें याप्ट
थ्वीसाठीं एक सूर्य आहे तसें लोकांच्या मनांत प्रका
श करण्याकरितां एकच खरेंशास्त्र आहे" यागोष्टी
वरून भट्टास फार हांस्य येतें परंतु तें व्यर्थ आहे· ज्या
गोष्टी यामतावर त्यानें लिहिल्या त्या माझ्या मागील
पोथीवर नाहींशा झाल्या· त्यांत असें सांगितलें की
जर बाप यथार्थ रीतीनें चालतो तरतो आपल्या मुलां
स विपरीत आज्ञा देणार नाही· देव लोकांस वेगळे
वेगळें व्यापार सांगतो परंतु वेगळे वेगळे नेम सांग
तनाहीं· एकमाणसानें चोरीकरावी आणि एकानें न
करावी असें सांगत नाहीं· आपले गुणवकर्मांचें वर्ण-
न कोण्हाजवळ पृथक् कोण्हाजवळ पृथक् असें दे
व करणार नाहीं· तो सर्वांजवळ भीड व प्रीति मा
गेल· मृत्युलोकींचाही बाप आपल्ये पुत्रास विपरी-
त सांगत नाहीं मग देव त्यापेक्षां फार मोठा तो आप
ल्या लोकांस नेम व धर्म विपरीत कसे सांगेल?
जो दृष्टांत मीं सूर्याविषयीं दिल्हा तो उत्तम आहे· ज

सें याप्टथ्वीसाठीं एक सूर्य आहे तसें या प्टथ्वींत एक ख
रें शास्त्र आहे· भट्टानें असें सांगितलें आहे कीं अति
शय दूर जे तारे ते सूर्य आहेत· ही त्यानें खरी गोष्ट प्र
काशित केली यामुळें मी फार आनंदलों· तो हिंदुशा
स्त्रांप्रमाणें ही गोष्ट अगदीं दर्शवित नाहीं याविषयीं
संशय नाहीं· मनुस्मृतींत असें लिहिलें आहे कीं·

तस्मिन्नंडेसभगवानउषित्वापरिवत्सरं॥
स्वयमेवात्मनोध्यानात्तदंडमकरोद्द्विधा॥
ताभ्यांसशकलाभ्यांचदिवंभूमिंचनिर्ममे॥
मध्येव्योमदिशश्चाष्टावपांस्थानंचशाश्वतं॥

तस्मिन्नेति — पूर्वोक्त अंडाच्याठायीं तो भगवान राहू
न आपणच दोनप्रकारचा होतो आणि आपल्या ध्या
नमात्रेंकरून तेंच ब्रह्मांड दोनप्रकारचें केलें १२
ताभ्यामिति-त्या ब्रह्मांड शकलाहीं उत्तर शकलानें
स्वलोक निर्मिला· आणि खालच्या शकलानें भूमि
लोक निर्मिला· आणि उभयांच्यामध्यें आकाश व
अष्टदिशा आणि उदकांचें गृह असा समुद्र निर्मि
ता झाला· जरीं याविरुद्ध भट्टानें लिहिलें आहे तरीं
ठीक झालें· सृष्टीमध्यें पुष्कळ सूर्य ह्मणजे स्थिर ता
रे आहेत तथापि प्रकाशरूप स्वभाव सर्वांचा एक-

च दिसतो· ह्मणून यावरून जर शास्त्रांविषयीं दृष्टांत घ्यावा तर सर्व शास्त्रांचें मत एकच असावें· परंतु त्यांच्या मतांत बहुत वैपरित्यें असतां मोरभट्टाच्या मताप्रमाणें कशीं खरीं होतील ? निश्चय एक खरा धर्म आहे हें प्रदर्शित आहे *

* हिंदु धर्म त्यागाचें फळ जी चवथी गोष्ट आतां आह्मीं लिहितों तीजविषयीं भट्टाच्या मताचा शोध करावा· त्यानें असें सांगितलें कीं "अन्यदेशांतील लोकांच्या मतांत जे येथील लोक शिरतात ते अधिक भ्रष्टमात्र होतात"· "कितीएक वर्षांपूर्वी गोवें व वसई प्रांतांतील लोक पोरटुगी लोकांनीं आपल्या ख्रीस्ती धर्मांत आणिले."

ज्या साधनानें पोरटुगी लोकांनीं हिंदूस आपल्या धर्मांत आणिले आणि जें आचरण त्यांपासून झालें हीं ज्या ख्रीस्ती उपाध्यांविरुद्ध भट्ट लिहितो ती ते मानित नाहींत पोर्टुगी लोकांनी बळात्कारानें शिष्य केले परंतु अशाकरण्यानें ढोंगीमात्र होतील:- ख्रीस्ती उपदेश दिल्यावांचून व ख्रीस्ती आचरण मागण्यावांचून त्यांनीं त्यांस ख्रीस्ती नाम दिल्हें आणि ख्रीस्ती शास्त्र वाचायास दिल्हें नाहीं· ज्या वाईट

शी

रीतीनें हिंदुलोक वर्ततात त्यारीतीनें बहुतकरून वर्तूं दिलें· आणि त्यांचीं दुष्टकर्में प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांस मंडळींतून बाहेर टाकिलें नाहीं· उपाध्यानीं त्यांस खरे धर्माविरुद्ध चालविलें· जें मत खऱ्याशास्त्रांत विपरीत ख्रीस्ती ह्मटलें आहे तदनुयायी ते प्रसिद्ध दिसतात· जरी गोवेंकर एक देवाला एक तारणाराला मानितात ह्मणून ते हिंदुलोकांपेक्षां कांहीं बरे खरे तरी ते पुष्कळ सिद्धांत आणि आज्ञा यांविषयीं चुकतात· परंतु जसें हिंदुधर्माचा त्याग झाल्यावर गोवेंकर व पोर्टुगी तुह्मी व्हा असें आह्मी हिंदूस ह्मणत नाहीं तसें यागोष्टीविषयीं बहुत लिहिण्याचें प्रयोजन नाहीं· तथापि भट्टाच्या लिहिण्यावरून कोणी आधांटी नघ्यावी ह्मणून स्वल्पतर एक दोन गोष्टी लिहितों·

मांस खाण्याविषयीं हिंदुलोक कारणावांचून बहुत दूषितात· शाकाभाज्यादिकीं जीव आहे आणि त्यांच्याठायीं मनुवाक्यानुसार सुखदुःख भोक्तृत्व आहे असें जरीं समजत आहेत तरीं ते कांहीं मनांत शंका आणिल्याशिवाय खातात· हिंदुशास्त्रांत तैलाविषयीं बहुत दोष सांगितले आहेत तथापि हिंदुलोक बहुत तैल भक्षण करितात· ब्राह्मण होत्साते शेणचें इत्यादि जल-

शा

शाक असे ह्मणून मत्स्य भक्षितात. सत्ययुगीं गोयज्ञ करून तच्छेष ब्राह्मण भक्षित असत याविषयीं महान् विद्वान ब्राह्मण मान्य आहेत. यागोष्टीचें स्थापन वेदानेंही होईल आणि बहुत पुराणानुसार विश्वामित्राच्या यज्ञीं दहासहस्र गोमेधकरून तदुच्छिष्ट बहुत ऋत्विजानीं भक्षिलें हेंही सिद्ध होईल. पितृपक्षीं अकरा जातींचें मांस ब्राह्मण खात असत. मत्स्यपुराणाप्रमाणें सातब्राह्मणानीं पक्षाच्यावायीं गर्गऋषीचीगाई कांहीं क्षुधेमुळें सर्वगिळून भक्षिली. सूक्ष्मजंतु उदकादिक पदार्थी आहेत ते लक्षावधि ब्राह्मण लोकांच्या उदरांत जातात. मार्ग व शेत इत्यादिकांवर ब्राह्मणांच्या पायांखालीं लक्षावधि किडे मुंगी इत्यादिक जंतु मरतात. असें असतां जे ख्रीस्तीलोक मांस भक्षण करितात त्यांजवर ब्राह्मण कां रागें भरतात? कोणेसमयीं देवांला यज्ञनिमित्त पशु मारण्याविषयीं आज्ञा देण्याची शक्ति आहे आणि अन्न मिळवण्यासाठीं आज्ञा देण्याची शक्तिनाहीं कीं काय? मनुष्यांच्या इच्छेशिवाय जर प्रतिक्षणीं कोटिशः जंतुक्षय करण्यास देतो तर उपयोगीं पडण्याविषयीं क्षयहोऊं देणार नाहीं कीं काय?

उगीच जंतूस दुःख देणें हें ख्रीस्तीलोकांस फार

वाईट दिसतें. जंतुविषयीं त्याचें मत असें आहे कीं मनुष्य व पृथ्वींतील ह्यांचा इतर जंतु आत्मा स्वभावें करून परिणामें करून विपरीत आहे. बुद्धि ज्ञान इत्यादि मनुष्यांला विशेष आहेत व देव संन्निधनीतीविषयीं आज्ञांकित आहेत परंतु इतर जंतु असे नाहींत. कांहींका देशीं लोकांच्या उपजीविकेसाठीं भाज्या व बीजें पुरत नाहींत. ख्रीस्ती शास्त्राप्रमाणें मांस खायास देवानें लोकांस रजा दिली आणि यांमधून पुष्कळ लोक देवाचा उपकार मानून खातात. परंतु कीं मांस खावें असा विधि नाहीं. येशू ख्रीस्ताचा प्रेषित जो पाउलस त्यानें पवित्र आत्म्याकडून असें लिहिलें आहे कीं "कोणी विश्वासतो त्यानें सगळें खावें खरें परंतु जो अशक्त तो भाजा खातो. जो खातो तो नखाणारा ला नधिःकारो आणि जो खात नाहीं तो खाणाऱ्याचा न्याय नठरवो कारण कीं देवानें त्याला स्विकारिलें आहे."

कीं ख्रीस्ती धर्म मद मानितो असें कोणेकाच्या मनांत येणार नाहीं. जरीं औषधासाठीं व कांहीं उपयोगीं प्रयोजनासाठीं द्राक्षरसादिकामास पडतात तरीं ज्याणें मद उत्पन्न होई असें नघ्यावें. ख्रीस्ती शास्त्रांत मदाचा निषेध पूर्तेपणीं केला आहे. त्यांत असें लिहिलें आ

आहे कीं " तुमचीं हृदयें गुंगी व मद्यपान व संसारिक चिंतनें यांकडून कधीं जड नव्हावीं ह्मणून सावध व्हा. रंगामध्यें व मद्यपानामध्यें आह्मी नचालावें तुह्मी मद्या नें माजूं नका यांत अनिवारण आहे. जे याकामांत अस तात त्यांचा देवाच्या राज्यांत कधीं प्रवेश होणार नाहीं" मद्यपी जे आहेत ते किंचित ख्रीस्ती धर्मांत नाहींत. ख्रीस्ती नाम जर आपणाला देतात तर ते आपणाला फसवितात अथवा भारी ढोंग करितात.

कीं भट्टानें असें सांगितलें आहे कीं गोंवेकर अतिशयच्च अमर्याद झाले यामुळें मला कांहीं आश्चर्य वाटतनाहीं परंतु याविषयीं त्यांचें आचरण वाईट असेल यांजवर मीं बहुत दोषारोप करितों. परंतु मर्यादेविषयीं ब्राह्मण लोकांची गोष्ट त्याप्रमाणें कोण सत्यमानील? स्वभावाविषयीं जरी ते सगळे इतर लोकांसारखे आहेत तरीं हिंदु शास्त्राप्रमाणें याचीं भीड व भय बहुत धरावीं. जे ब्राह्मणास वंदितात याचें पाप त्यांच्या हस्तांतील अग्नीनें नाहिंसे होईल त्यांस दान देण्यानें बहुत पुण्य व घोर पापासाठीं प्रायश्चित्तें मिळतील. त्यांचें भजन करावें त्यांच्या शापांतील देवांस उपद्रव होतात आणि त्यांच्या र

क्ष

क्षणार्थ खोटी साक्ष द्यावी अशागोष्टी शास्त्रांत प्रसिद्ध आहेत. मनुसंहितेमध्यें हे श्लोक मिळतात कीं

उत्पत्तिरेव विप्रस्य मूर्तिधर्मस्य शाश्वती ॥
सहिधर्मार्थमुत्पन्नो ब्रह्मभूयाय कल्पते ॥ १
ब्राह्मणोजायमानोहि पृथिव्यामधिजायते ॥
ईश्वरः सर्वभूतानां धर्मकोशस्य गुप्तये ॥ २
सर्वस्वं ब्राह्मणस्येदं यत्किंचिज्जगतीगतं ॥
श्रैष्ठ्येनाभिजनेनेदं सर्वं वै ब्राह्मणोर्हति ॥ ३
स्वमेव ब्राह्मणो भुंक्ते स्वं वस्ते स्वं ददातिच ॥
आनृशंस्याद्ब्राह्मणस्य भुंजते हीतरे जनाः ॥ ४
पुनाति पंक्तिवंश्यांश्च सप्त सप्त परावरान् ॥
पृथिवीमपिचैवेमां कृत्स्नामेकोपिसोर्हति ॥ ५

ह्मणजे — ब्राह्मण देहाचें जन्म धर्माचें अविनाशी शरीर होय. ज्याकारणास्तव धर्म संरक्षणार्थ ब्राह्मण उत्पन्न झाला ह्मणून धर्मानुगृहीत जें आत्मज्ञान तेणेंकरून मोक्षार्थ संपन्न होतो — ज्याकारणास्तव उत्पन्न होणारा जो ब्राह्मण तो पृथ्वीच्याठायीं सकल वर्णाहून श्रेष्ठ होतो. सकल भूतमात्रांचा धर्म समूहाचें रक्षण करणारा ब्राह्मण आणि सकल भूतमात्रांस धर्मोपदेशही करणारा ब्राह्मणच वास्तव सर्व वर्णांचा व सर्व धर्मांचा

ब्रा

[illegible] Oriental MSS. Library
Elphinstone P.O., [illegible]

ब्राह्मणच प्रभु जाणावा – पृथ्वींतील सकल धनाचा
स्वामी ब्राह्मण हें ब्राह्मणास मुख्यत्वेंकरून अधिका
राविषयीं स्तुत्यर्थ लिहिलें. वस्तुतः पृथ्वीगत सकल
धन ब्राह्मणास स्वकीय धनासारिखें आहे. याचें का
रण स्तेयप्रकरणीं ब्राह्मणासही चौर्यप्रयुक्त दंड श्री
मनूनेंच लिहिला आहे. ब्रह्मदेवाच्या मुखापा
सोन ब्राह्मणवर्ण उत्पन्न झाला आणि अभिजनत्वही
आहे ह्मणून सकलद्रव्यग्रहणीं ब्राह्मणच योग्य आहे–
परकीय अन्नादिभक्षण परकीय वस्त्रपरिधान तसें
च अन्यापासून द्रव्य ग्रहणकरून अन्यास देणें हें स
र्वही ब्राह्मणाचेंच ह्मणजे धन असें जाणावें. हें ही पूर्व
वाक्यासारिखें स्तावक वाक्य जाणावें. संपूर्ण लोक
जे कांहीं अन्नादिक भक्षण करितात तें सर्व ही ब्रा-
ह्मण कृपेकरूनच असें जाणावें– मनुप्रणीत हें धर्म-
शास्त्र जें यातें अध्ययन करणारा जो पुरुष तो आनुपू
र्व्यकरून निविष्ट जो जनसमूह त्यातें पवित्र करितो.
वंशभवांश्च सप्तपरान्पित्रादीन अवरांश्च सप्तपुत्रादीन–
चतुर्दश पुरुष जे यांतें पवित्र करितो. संपूर्ण पृथ्वी ग्र
हण करण्यास सकल धर्मज्ञत्वास्तव योग्य होतो हे. यां
स असा मान कोण देईल? कीं यामध्यें कांहीं योग्य-
ता

ता नाहीं असें कोणी ह्मणेल तर त्याजवर कोण दोषारो
प ठेवील?

पोर्तुगीज व गोंवेंकर यांपेक्षां ब्राह्मण माझ्या दृ
ष्टीसमोर विशेष अमर्यादा करीत असतात. आपल्या
स्वदेशी शूद्रांवर पुष्कळदां वतवतून त्यांचा स्पर्श न
व्हावा व प्रतिच्छाया नपडावी ह्मणून मार्गसोडरे अ-
शी हाकमारितात. असा नानाप्रकारें त्यांचा तिरस्कार
करितात. अशा आचरणावर बहुत दोषप्रक्षेप केला
पाहिजे. यारीतीनें ब्राह्मणलोक वर्ततात ह्मणून दुस-
ऱ्यालोकांस अमर्यादी बोलणें फार अयोग्य आहे. प
रंतु दुसऱ्यावर दूषण दिल्यावांचून ख्रीस्तीमताचें प्र
तिपादन होतें. हा पवित्र धर्म परस्पर लोकांच्या प्रीती
ची वृद्धिकरायास योजिला आहे. याचा प्रथम सिद्धां
त असा आहे कीं जशी आपणावर तशी आपल्या शे
जाऱ्यावर प्रीति कर. याच्या शास्त्रांत अशा आज्ञा
सांपडतात कीं तुह्मी बंधुप्रीतींत एकमेकांविषयीं
प्रेमळ व्हा. सन्मानानें एकमेकांस थोर माना. तुमच्या
नें जर साध्य तर सर्वमाणसांस हित करीत असा
तुह्मी आपला सूड घेऊंनका परंतु क्रोधाला जाऊंद्या.
जर तुझा वैरी भुकेला तर त्याला अन्न दे जर तो ता
न्हे

न्हेला तर त्याला पियावयास दे. तुमच्या पाठीस जे लागतात त्यांला आशीर्वाद द्या परंतु शाप देऊं नका. जे आनंदतात त्यांसहित आनंद करा आणि रडतात त्यांसहित रडत जा. उंची जीं त्यांस चित्त देऊं नका परंतु जे नम्र त्यांची सोबत धरीत जा. प्रत्येक जन वरिष्ठ अधिकाराच्या स्वाधीन असो कां कीं देवावांचून अधिकार नाहीं. जे अधिकार आहेत ते देवाकडून स्थापलेले आहेत. तुम्हीं सर्वांचीं देणीं भरून द्या ज्याचे कर त्याचे कर ज्याची जकात त्याला जकात ज्याचें भय त्याला भय ज्याचा सन्मान त्याला सन्मान अशीं द्या. तूं व्यभिचार करूं नको. तूं हत्या करूं नको. तूं चोरी करूं नको. तूं खोटी साक्ष देऊं नको. तूं लोभ करूं नको. एकमेकांवर दृढ प्रीति राखीत जा. कुरकुर केल्यांवांचून एकमेकांचें आतिथ्य करा. सगळ्यांची मर्यादा करा जे भाउबंद आहेत त्यांजवर प्रीति करा. देवाला भ्या आणि राज्याचा मान राखा. ह्या अतिपवित्र उच्चनीति आहेत. अशा आज्ञा मानून खरे ख्रीस्ती लोक देवाच्या अनुग्रहानें व पवित्र आत्म्याकडून असे वर्ततात. हें पाहून मूर्तिपूजकांची खातरी

हो

होती कीं ख्रीस्ती शास्त्र बहुत उत्कृष्ट आहे.

जो मोरभट्टाच्या मताचा भंग झाला त्यामुळें धर्मशोधकांच्या मनांत शंका येणार नाहीं असा माझा निश्चय झाला. त्यांच्या हितार्थ ख्रीस्ती धर्म जे सत्यतेनें व अंतःकरणानें धरितात त्यांस काय फळें प्राप्त होतील तीं आतां संक्षेपानें सांगतों. तीं अतिमोल्यवान इहलोकसंबंधीं परलोकसंबंधीं आहेत. देवाचे नियम वर्णनाची पवित्रता न्यायत्व विस्तार आणि पापाचा कुत्सितपणा व दंड व आपलें आज्ञांकित्व दुष्टत्व दोष पाहून येशू ख्रीस्तापाशीं शरण जातात आणि त्याच्या पुण्यावर भरवसा ठेवितात व त्याच्या कृपेनें भार लावितात. त्यांस आपल्या सर्व पापांची क्षमा मिळती. याप्रमाणें देवाचा जो अनुग्रह तो त्यांस. देव आपलें जें विपरीत कर्म ज्यामध्यें सर्वदां कांहीं न्यूनता राहात्ये यामुळें प्राप्त होत नाहीं तो येशू ख्रीस्ताकडून त्यांस प्राप्त होतो. देव आपला पवित्र आत्मा त्यांच्या ठायीं स्थापून त्याच्या योगानें व गोष्टींकडून दुष्ट वासना सोडवितो. जीं उत्तम त्यांवर प्रीति करून कुवासनांच्या शक्तिपासून व राज्यापासून अंतःकरणीं शब्दांत व कर्मांत पवित्र होतात. देव त्यांच्या अं

तः

अंतः करणांत शांतिठेवितो आणि उत्पन्न करणारा
ला ते बाप व मित्रमानितात. कष्टसमयीं ते सहाय
तेकरतां समजुतिसाठीं त्याकडे पाहतात तेव्हां ये
शूख्रीस्तास्तव तो त्यांचे मनोरथ पूर्णकरितो. म-
रणसमयीं त्यांस देव सोडितनाहीं कारणकीं ज्यांव
रतो प्रथम प्रीति ठेवितो. त्यांजवर शेवटपर्यंत ठेवि
तो. त्यांचे आत्मे शरीरांतोन निघून देवलोकीं नेले
जातात. ते आशिर्वादित जाग्यामध्यें पवित्र दूतां-
जवळ आणि इतर तारलेल्या लोकांजवळ राहता
त. देव व तारणारा यांचे गौरव पाहतात आणि दे
वाची स्तोत्र सेवनादि करितात. जीं त्यांचीं शरीरें
देवाच्या शक्तिनें नाशास जातात तींच शरीरें पुनः
त्याच्याशक्तिनें भूम्यादिकांपासून शेवटीं उठविलीं
जातात. ते सर्वलोकांसमीप येशूख्रीस्तामुळें पुण्य
वान् ठरविले जातील. ज्यावेळेस बर्कडलोक तार
णाराशिवाय आपल्या पापांत मरून शापग्रस्त हो
ऊन सर्वकाळिक दुःख भोगितील त्यावेळेस ते आ
शिर्वादित व गौरवयुक्त होतील. तारणाराच्या अ
विनाशी पुण्यानें अनंतकाळ त्यांची शांति सुखें
वाढतील व राहतील. मनापासून ख्रीस्ती धर्माचें
आ

आकलन केलें असतां हिंदुलोकांदिकांस अशीं सुफ-
ळें होतात वास्तव बहुतलोकांस सर्वकाळाचेंजीवन
आणि तीं सुखें प्राप्तव्हावीं म्हणून मी फार फार देवा-
ची विनंती करितों.

हिंदुशास्त्रांत जे उपाय सांगितले आहेत तदनु
सार उद्धार व तज्जनित सुफळें कधींहि प्राप्त होणार
नाहींत. कांकीं मागील लिहिलेल्या गोष्टींवरून ते
भगवत्संबंधीं नाहींत असें दिसतें. त्यांमध्यें वास्त-
वीक अयोग्यता आहे म्हणून ते केवळ व्यर्थ आहे
त असें जाणावें. जरीं त्यांमध्यें कांही मिश्रितार्थ आ
हे तरीं ते सहावर्णांमध्यें सामावतात. ब्राह्मण देव
लोकहित भक्त मृत्यु पशु पक्षि निर्जीव यांविषयीं
कांहीं कांहीं आहेत.

ब्राह्मण पूजन भोजन उद्योग दक्षणा इत्यादि
देण्यानें पाप जातें म्हणून हिंदुशास्त्र सांगतें हें फार
अयोग्य व चुकांयुक्त आहे. पाप म्हणजे भगवत्वि-
रुद्धदोष आहे असें असतां पापाछादन होण्यापर्यं
त पाप्यांवर देवाचा क्रोध आहे. असा जरी नियम
ब्राह्मणाविषयीं देव सांगे आणि जरी त्याप्रमाणें म
नुष्यें यथास्थित ते नियम करितात तरीं झालेलें पा
प

पआईना · त्या गोष्टीनें जन फसविलें मात्र जातें स्पष्ट
न माझें मन दयाभूत होतें · देवाच्या गौरवापेक्षां आ
पलें माहात्म्य शोधणारे हिंदुशास्त्र कर्ते होते असें थो
डाबहुत विचार केला ह्मणजे समजेल · ब्राह्मणाच्या
सांगितलेल्या पदवीवरून व कथेवरून समजेल ·
ज्या गोष्टी आह्मी पूर्वी सांगितल्या आणि पुढें सांग-
णार त्या ध्यानांत आणिल्या पाहिजेत · हिंदुशास्त्रा-
प्रमाणें ब्रह्मदेवाच्या मुखापासून ब्राह्मण उत्पन्न
झाले · त्यांस मात्र वेदाध्ययनाची व श्रवणाची यो-
ग्यता आहे · ब्राह्मण व त्यांच्या स्त्रिया यांची इतर
लोकांनीं पूजा करावी · त्यांस क्रोध देवाचे क्रोधासार
खा. फार मोठा आहे · बहुतवेळा त्यांनीं देवास लत्ता
प्रहार केले फटके मारिले शाप दिल्हे भयाभित व
नीच केले आणि देवाच्या मुलग्यांचा नाश केला ·
त्यांच्या जातीतील जो विश्वकर्मा त्यानें सूर्याची हा
दश शकलें केलीं · बृहस्पतीनें चंद्रास खर्परासा
रिखा निस्तेज केला · विश्वकर्म्यानें स्वर्गलोक निर्मा
ण केला · कोणे एक ब्राह्मणानें तृणापासून मूल निर्मि
लें होतें तेथें सीतेचें एक मूल तेथें होतें त्या दोघांला
पाहून मोह होऊन तिला आपलें कोणतें हें ओळखवलें
ना

नाहीं · कश्यपानें अग्नि उत्पन्न केला · भृगुनें त्या-
ला दहनशक्ति दिल्ही · सत्तानें विझण्याचा गुण दि-
ल्हा · अगस्तीनें समुद्र तीन आचमनीं शुष्क करू
न फिरून शिश्नद्वारें विसर्जन करून क्षार केला ·
असें थोतांड सांगण्यानें ब्राह्मणांस भीड व भय
उत्पन्न करून दिल्हीं · त्यांचे जीव दुसऱ्याच्यापेक्षां
ही राखावे · त्यांनीं जरीं घोरपापें केलीं तरीं त्यांचे
प्राण नघ्यावे · ब्राह्मणानें जरीं कोणास जिवें मारि
लें आणि जर त्यासाठीं कोणी रडला तर तो प्राय-
श्चित्ती होतो · मनुष्याच्या रक्तानें देवी सहस्त्र वर्षां
पर्यंत प्रसन्न होती परंतु तिला ब्राह्मण नअर्पावे ·
गरुड ब्राह्मणाशिवाय सर्व जंतु भक्षित असे परं
तु जर ब्राह्मण भक्षिता तर त्याच्या उदरांत बहु-
त उष्णता असती · मनुनें असें सांगितलें आहे की
ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्रादि कांहीं ब्राह्मणाचा
वध बुद्धीनें दंडादिक उचलिले आणि जरी
मारिलें नाहीं तथापि शंभर वर्षेपर्यंत तामिस्त्र नरका
च्याठायीं ते पतन पावतात · बुद्धिपूर्वक क्रोधें करून
ब्राह्मणास तृणादिकेंकरून ताडन केलें असतां एक
विंशति जन्म कुक्कुर मार्जार इत्यादि योनी भोगा-
व्या

ल्या लागतात. केवळ ब्राह्मणांचें जीवमात्र रक्ष-
ण करावें असें नाहीं तर त्यांस बहुत सुखही द्या
वें. जितकीं अर्पणें देवाल्यांत होतात तितकीं त्यां
स पोंचतात आणि त्यांस दान देण्यानें घोर पापा-
चें प्रायश्चित्त होतें. जर कोणी आपली गाय वि-
कील तर घोर पापी होईल आणि जर ब्राह्मणास
दान देईल तर त्याला उद्धार प्राप्त होईल. जो दश-
हारामध्यें कोणी ब्राह्मणास ग्रामदान करील त्या
ला अगाध पुण्य होतें तो सूर्यापेक्षां कोटिगुणी ते
जस्वी होतो त्याला कोटि कुमारी गाड्या मेनें प्राप्त
होतील आणि ज्या भूमीचें दान केलें तिचे जितके
रजःकण असतील तितक्यां वर्षांपर्यंत तो आप
ल्या पित्रांसहित स्वर्गलोकीं सुख पावेल. भूमिदा
नानें स्वर्ग प्राप्त होतो. कपिला गायीदानानें वैतर
णी नदी तीन पार होतो. गृहदानानें स्वर्गींचें राज्य
प्राप्त होतें. छत्रदानानें मार्गामध्यें उष्ण निवारण
होतें सुगंध दानानें कुत्सित गंधी विरक्तता होती.
अन्नदानानें बहुत पुण्य होतें. जर कोणेकाच्या गृ
हावर अपवित्र उलूकादिक पक्षी बसले तर तें अ
पवित्र होतें परंतु तें गृह जर ब्राह्मणास दिल्हें तर

प

पवित्र होतें. अपराधी पुरुषाच्या मरणकाळीं जर
ब्राह्मणास दान केलें तर तो पापापासून सुटेल. ज्या
पासून ब्राह्मण द्रव्य घेतात ते त्याचे बहुत उपकारी
होतील. एथें अधीक लिहावयाचें कारण नाहीं.
मी सांगितलें यावरून स्पष्ट होतें कीं हा हिंदुधर्म
ब्राह्मणांनीं उत्पन्न केला देवापासून नव्हे. दानादि
कर्ण्यानें ब्राह्मणाकडून उद्धार प्राप्त होईल असें
जे समजतात ते केवळ भ्रांत आहेत.

जी सेवा हिंदु देवांची होती तीही ब्राह्मणाच्या
सेवेप्रमाणें व्यर्थ आहे. हिंदुदेव पापिष्ट व मनःक
ल्पित आहेत त्यांचीं स्मरण मनन निदिध्यास साक्षा
त्कार नामोच्चरण स्तवन वृत्त कामन मानन देवस्था
न बांधणें व मूर्तिस्थापन दान यज्ञ होम प्रार्थना शा
स्त्रश्रवण गायत्र्युच्चार इत्यादि अत्यंत दुष्ट आहे
त. खरा देव अशीं कर्में अगदीं धिःकारील. जर
लोक सांगतील कीं हीं ह्याला लागतात तरीं पाप्यां
साठीं प्रायश्चित्त ह्यांपासून अगदीं होणार नाहीं. मा
णसाच्या सर्व शक्ति व जीव याप्रमाणें सेवा देव मा
गतो. ही सेवा आजपासून पूर्ण जरीं असेल तरीं
जी अगोधर कमती असेल ती ह्याणें पूर्ण होणार

ना

नाहीं · जें ऋण वाण्यापासून काढिलें आहे तें पुढी-
ल विकत घेतल्याच्या पदार्थ बराबर देण्यानें जात
नाहीं ·

आतिथ्य करणें दारिद्र्यांस व दुखणेंकऱ्यांस
सहाय होणें झाड लावणें विहीर व तळें बांधणें इत्या
दिकर्में लोकोपकारास उचित आहेत · परंतु जसें फि
तुरपणासारिखें पाप देवाचें गौरव विरुद्ध आहे तसें
अशीं कामें करण्यानें पापाचें प्रायश्चित्त कदापिहो
णार नाहीं ·

जे नियम भक्तांविषयीं आहेत ते बहुतकरू
न अतिपापिष्ट आहेत · सरकारच्या दंडानें पाप जातें
असें जे सांगतात ते बहुत चुकतात · देवाच्या आज्ञा
भंग केल्या ह्मणून त्याची सुप्रसन्नता मिळवण्यासा
ठीं कांहीं नकरावें कीं काय? जो वृद्धावस्थेंत वान-
प्रस्थ आश्रम घेतो तो मात्र आपल्या स्वकीयांचें सहा
य करणें सोडून लोकहितार्थ आपली भक्ति प्रगट क
रितनाहीं · जो आपल्या घरीं किंवा तीर्थीं स्नान क
रितो तो असें समजत नाहीं कीं मनांतील पाप व
त्यामुळें जो दोष देवाच्या पुस्तकांत लिहिलेला आ
हे तो पाण्यानें जातनाहीं जे उपवास देहदंडणइत्या

दि

दि करितात ते देवासारिखे होतात आणि देवास भ
यभीत करितात असें जरीं सांगितलें आहे तरीं त्यां
त देवाच्या सेवेचें उल्लंघन होतें · जी देवानें पापनि
मित्त दंड सांगितला आहे त्याच्याठिकाणीं देहदंड-
णादिकांस स्विकारील कीं काय ? तें मानवराजाही
स्विकारणार नाहीं · पंचगव्य प्राणायाम इत्यादि ए
वढीं अशीं हलकीं आहेत कीं त्यांचा उच्चारही क
धीं नकरावा · शरणावर व गंगातिरीं सती करणें आ
णि मूर्तीच्या रथापुढें शरीर टाकणें इत्यादि स्वहत्या
करणें फार वाईट आहे यांमुळें विवेकीही दोषठेवि
तो · यांमुळें देवाचा क्रोध होतो कांकीं देवानें दिले
ला जो प्राण त्याचें रक्षण करावें · पश्वादिकही त्यां
चें रक्षण करितात ·

श्राद्धादिकांपासून मृतांस लाभ होतो अशा सां
गण्यानें लोकांचा केवळ बंदोबस्त तुटतो · दुष्टांस ज्या
दंडाचें भय आहे ते अशा सांगण्यानें कमी होतें · कीं
मरणानंतर पवित्रता व पुण्य मिळवण्यावांचून
विरक्तता होईल अशी आशा करविण्यानें पापाची
वृद्धि होती · तर श्राद्ध जे करितात त्यांस पुण्य होईल
असें कां ह्मणावें ? ह्या गोष्टीमुळें भ्रांति मात्र होती

जी

जी मनशुद्धता व जी क्षमा देव मागतो त्याठिकाणीं
ती मनुष्यांचीं हलकीं कर्मे चालतील कीं काय?

पशु व निर्जीव पदार्थ यांस भजणें योग्य आ
हे असें हिंदुशास्त्रांत जरीं सांगितलें आहे आणि ब्रा
ह्मणादि करितात तरीं त्यांत पाप व उपहास आहेत.
सूर्य चंद्र तारे आणि पंचमहाभूतें ह्मणजे पृथ्वी आ-
प तेज वायु आकाश हीं सर्व देवानें उत्पन्न केलेलीं
आहेत खरीं. परंतु त्यांची सेवा मूर्तिपूजेसारिखी वा
ईट आहे. गंगेच्या पाण्याने पाप जातें हें व निर्जीव
पदार्थाविषयीं जीं वाक्यें सांगितलीं आहेत तीं खोटीं
जाणावीं. गायी वान्नर कुत्रें कोल्हा पक्षी इत्यादिकां
स नमन करणें फार वाईट आहे कांकीं ते मनुष्या
पेक्षां नीच आहेत. हें लेंकरांसही ठाऊक आहे. जे
उपमातेची गोष्ट ऐकतात व जे वेडे आहेत त्यांशिवाय
दुसरे लोक झाडें पुस्तकें शालिग्राम लांकडाचे तुक
डे इत्यादिकांचें भजन करितील कीं काय?

देव मानील असे उद्धाराचे उपाय हिंदुशास्त्रां
त कांहीं मिळत नाहींत. जे हिंदुउपायांवर भाव ठेवि
तात त्यांचा नाश होऊन क्षयास जातील कांकीं वि-
श्वास मनामध्यें असावा आणि तो चांगल्याठिकाणा

व

वर बसावा. हिंदुधर्माच्या उपायाप्रमाणें माणसाला
तरण्याची शक्ति आहे परंतु अशी गोष्ट नव्हे लोक
अशक्त अज्ञानी व सहजवृत्त्या पापपरायण आहे
त. देवाच्या नियमाप्रमाणें आपल्या संपूर्ण अंतः
करणानें जीव मन बल इहीं करून ते देवावर प्रीति
ठेवितनाहींत. कल्पना शब्द व कर्मे इहींकरून देवा
समीप नित्य अपराधी होतात. आपल्या कर्मानें उ
द्धार मिळेल असें जर ते समजतील तर त्यांलो पा
प ह्मणजे भारी कठिण आहे असें समजणार नाहींत.
दूतादि असें बोलूंलागतील कीं जरी आह्मी पाप करूं
तरीं फारसी चिंतानाहीं. कांकीं त्याचा क्षय करण्या
चा उपाय आमचे जवळच आहे. यामुळें मनुष्यें पापा
चरण करण्यास फारच उद्युक्त होऊन देवाच्या आ
ज्ञाधिःकारतील. आणि पवित्रता व पापद्वेष त्याच्या
गुणामध्यें आहेत ते ध्यानांत येणार नाहींत. जे आप
ल्या कल्पित पुण्यावर भरंवसा ठेवितात ते सांगत
असतात कीं सर्व उपायांमध्यें प्रार्थना व पश्चात्ताप
हे उपाय मुख्य आहेत. हीं कामें करणें योग्य आहे प
रंतु यांपासून उद्धार मिळणार नाहीं "माझ्या आज्ञा
मानाव्या परंतु जर कांहीं मोडल्या जातील तर कांहीं

शो

शोक करावा व माझें नाव घ्यावें"अशा आज्ञा कोण
राजा देईल? असें जर ह्मणेल तर लोक ह्यांचें ऐकू
न फितुरीमात्र होतील. असें असतां जो राजांच्या रा-
जा प्रभूंचा प्रभु तो आपल्यां प्रजांविषयीं असें सांगेल
कीं काय? आपलें न्यायत्व व पवित्रता यांच्या विरुद्ध
त्याला कांहीं मानवत व करवत नाहीं. येशू ख्रीस्ता-
च्या अतिमोल्यवान विश्वासयुक्त प्रायश्चित्तानें ख्री
स्ती धर्मांत देवाची दया व पूर्वोक्त गुणमात्रासाठीं प्र
गट होतात.

जो पापांत तळमळतो व पापामुळें शोक करि
तो त्याच्या उद्धारासाठीं हिंदुधर्मांत कांहीं आधार दि
सत नाहीं. जी मुक्ति हिंदुशास्त्रांत सांगितलेली आहे
तिची आशा न धरावी. तिच्यानें माणसाची आशा पू
र्ण करवत नाहीं. गौरवयुक्त देवानें अशी मुक्ति द्या
वी हें योग्य नाहीं. सायुज्यता मुक्ति ह्मणजे देवांत प्र
वेश होऊन ऐक्य होणें असें जे ह्मणतात ते जीवात्मा
व परमात्मा या उभयतांच्या विचाराविषयीं बहुत-
चुकतात. मनुष्यांचा आत्मा पापी अज्ञानी व दुःख
रूप आहे ह्मणून यांमध्यें कांहीं परमात्मा नाहीं हें स-
मजावें. सायुज्यता नाशसारखी आहे ह्मणून तिज

पा

पासून शांति व सुख होत नाहीं. सलोकता ह्मणजे देव
दर्शनरहित केवळ देवलोकीं मात्र राहणें सरूपता
ह्मणजे केवळ देवाचें रूपमात्र धारण करणें समीप
ता ह्मणजे देवाच्या सन्निध राहणें ह्या सगळ्या खोट्या
व अतिपापिष्ट देवांविषयीं असतां जे पवित्रतेवर
प्रीति ठेवितात व चांगल्यापाशीं रहायास इच्छितात
ते ह्या मुक्तिची आवड व प्रीति धरणार नाहींत. ह्या
मुक्ति प्राप्त झाल्यावर लोक किती काळ वर रहातील
हें कोणांस ठाऊक? खोटी साक्ष देणें ज्यामुळें चतुर्द
श पिढ्या नरकांत पडतात अथवा दुसर्या कांहीं
संतानाच्या पापानें कदाचित अधोगति होती जसें
पूर्वी झालें तसें दुसऱ्याच्या तपस्येनें देव व त्याचे
सहवासीही आसनापासून व अधिकारापासून प
तन पावतील. स्वर्गलोकीं पुण्याचा उत्तरोत्तर क्षय
होतो आणि तें सरल्यावर पुनः खालीं पतन होऊन
मग फिरून मुक्ति प्राप्त होण्यापूर्वी अनंत नीच व कु
त्सित जन्म ग्रहण केले पाहिजेत.

स्वल्प विचार केल्यावर हिंदुधर्म अप्रमाणि
क व सेवेविषयीं व परिणामाविषयीं अतिवाईट
आहे ह्मणून हा देवानें स्थापलेला असें नसतां त्यां

गा

गावें व याजवर कोणीही भरंवसा नठेवावा. जे
आपल्या उत्पादकाला किंचित तरीं मानून यालोकीं
व परलोकीं आपल्यासाठीं व मित्रासाठीं सुखमा-
गतात त्यानी एतत्क्षणीच याचा त्याग करावा. जे
त्याचा अंगिकार करून तदनुसार चालतात ते नि
श्चय सर्वकालिक दुःख व नाश पावतील. हिंदुधर्म
देवाची सर्व प्रतिष्ठा हरण करितो व त्याचे गुण व अ
स्तित्वं यांजवर दोषप्रक्षेप करितो आणि त्याला दुष्ट
कर्मे व दुष्टविवेकी असें हिंदुधर्म सांगतो जी देवा-
ची भीड व आभार स्तुति असावी ती त्यानें नाहींशी
होती. नाशवंत माणसें पांखरें व चतुष्पद व वळव
ळणारीं यांच्या मूर्तिचे गौरवासारिखें हिंदुधर्म ना
शिवंत देवाच्या गौरवाला मानितो. आणि माणसां
च्या बुद्धींत व विवेकांत भ्रांति उत्पन्न करून अप
वित्र वेश्यांच्याठायीं मन स्थापितो. पापाच्या दंडाचें
भय त्यांस उगीच नाहींसें करितो. हिंदुधर्माप्रमाणें
माणसांची पापिष्ट अवस्था दिसत नाहीं आणि या
पासून अशी उद्धाराविषयीं खोटी अयोग्य आशा
लोकाना उत्पन्न होती. याशिवाय ह्यांत बहुत दुष्ट
त्वें आहेत. ह्या धर्मावर भूषणें घालणें अगदीं व्य
र्थ

र्थ आहे कांकीं जर प्रेतावर अलंकार घातले तर तें
अधिक अघोरी दिसतें. ज्याच्या मनांत ह्या हिंदुधर्मा
विषयीं शंका येत नाहीं त्याचें मन फार भ्रांतिकर आ
हे आणि ह्या जनामध्यें खरेपणाची प्रीति नाहीं. ज्या
नी हा धर्म उत्पन्न केला त्यांस तेव्हांच ठाऊक होतें की
हा धर्म पुढें क्षयास जाईल. यामुळें त्यांस थोर नमा
नावें कांकीं सर्वांस ठाऊक आहे कीं शेवटीं सत्यध
र्माची वृद्धी होईल. ह्या देशांतील लोकांवर हिंदुधर्मा
मुळें बहुत उपद्रव फारवर्षें होत आला आहे तो सांप्र
त लोकानीं सोडावा. जों पर्यंत हिंदुधर्माप्रमाणें वर्तत
आहेत तों पर्यंत ज्या देवाच्या सत्तेनें ते वर्तत व
हालत चालत आहेत त्या देवासमोर ते भ्रष्टं आ
हेत. आमचे वाडवडील ह्याप्रमाणें चालले ह्मणू
न आह्मी चालतों असें जे सांगतात ते रामोशी भि
ल्ल पेंढारी इत्यादि चोर जे देशाचा नाश करितात
व राज्याची मान कापितात त्यांसारिखे आहेत. जी
सर्वांहून श्रेष्ठ गोष्ट आहे तिजविषयीं ते संसारिक गो
ष्टीपेक्षां अधिक मूर्ख आहेत. माझे वाडवडील द
रिद्री होते ह्मणून मीं द्रव्य घेणार नाहीं आणि मी
ही दरिद्रीच राहीन असें कोण ह्मणेल? माझे वा
ड

Oriental MSS. Library
Triplicane P.O., Madras

डवडील अज्ञानी होते म्हणून मीही ज्ञानाच्या अ
भ्यास करणार नाहीं असें कोण म्हणेल ? आमचे
वाडवडील वाइटामध्यें होते म्हणून आम्हीही वा
इटांत राहाणार असें कोण म्हणेल ? कोणी म्हण
णार नाहीं. आमचे वाडवडील ख्रीस्ती धर्मांत
नव्हते म्हणून आम्ही ही त्यांत असणार नाहीं अ
सें तरी कां म्हणावें ?

ग्रेट्ब्रिटन् म्हणजे ज्या विलायती देशापासून
आम्ही आलों त्यांतील लोक पूर्वी या देशासारिखे खऱ्या मा
र्गापासून दूर होते. अंधपरंपरा व कठोरपण यां-
ची प्रवृत्ति होती. तेणेंकरून बहुतांचा नाश झा-
ला. धर्माविषयीं तो देश या देशाप्रमाणें कांहींसा
होता परंतु ईश्वराची कृपा होऊन तेथें येशूख्री
स्ताचा धर्म प्रसिद्ध होऊं लागला. प्रथम तेथील लोकां
नीं ख्रीस्तीधर्माचें प्रमाण व उत्कृष्टता न जाणून सां
गणारांवर रागें भरून त्याचा पाठलाग केला. आ-
णि ते असें सांगत कीं आम्ही आपल्या वाडवडिलां
च्या रीतिप्रमाणें चालणार. आम्ही कांहीं विचार
शोध करणार नाहीं असें म्हणत. तथापि तारका-
चे सेवक नित्य आपलें काम करित असत. त्या
नीं

नीं देवावर भरंवसा ठेऊन देवापाशीं आशीर्वाद मा
गत असावा. आणि त्यानीं कांहीं कृत्य बळात्कारा
नें नकरतां विचाराच्या व ज्ञानाच्या गोष्टी सांगत.
लोक पापिष्ट जाणून त्यांस सांगितलें कीं होणार
क्रोधापासून तुम्ही पळून जा. येशू ख्रीस्ताकडून
पापाची क्षमा व पवित्र आत्म्याकडून पवित्रता व
सर्वकाळाचें गौरव तुम्हास मिळेल असें त्यांस सु
चविलें. सर्वकाळ ते लोकांचें कल्याण करीत अ
सत. तेव्हां विलायती लोकांवर देवाच्या अनुग्रह
होऊन धर्मांतर झालें. तें असें कीं आमच्या वाडव
डिलानीं सत्य गोष्ट ऐकून त्यांच्या मनांत बिंबली.
नंतर ते म्हणूं लागले कीं "आमच्या वाडवडिलानीं
चूक केली म्हणून आम्ही त्यांच्या मार्गानें चालणा
र नाहीं. जो खरा व जिवंत देव आहे त्यालामात्र आ
म्ही भजणार आणि त्याजवर भाव ठेवणार. आ
म्ही येशूख्रीस्तालामात्र तारणारा मानणार आणि
त्याच्या आज्ञाप्रमाणें देवाच्या साह्यतेनें आम्ही चा
लणार असें त्यानीं म्हटलें मूर्तिंची सेवा व इतर
भजनाची खोटी रीति त्याणीं सोडिली आणि जो
आत्मरूप देव त्याला अंतःकरणापासून सत्यप
णा

णानें भजले आणि ज्ञानाची वृद्धि व शांति यांचा
शोध केला· देवानें त्यांजवर कृपाकरून त्यांला आ
शीर्वाद दिल्हा आणि याप्रमाणें ते वर्तले ·जेव्हांपा
सून ते देवावर विश्वास ठेऊन त्याच्या आज्ञाप्रमा
णें वर्तोंलागले तेव्हां पासून त्याच्या संतानास स
रूपता मिळाली· जें गौरवयुक्त व थोर आमच्या
देशांत आहे तें ख्रीस्ती धर्मापासून आहे· इतर
देशामध्यें येशूख्रीस्ताच्या धर्माचीं सुफळें दिस
तात आणि १८३२ वर्षांमागें येशू ख्रीस्त अवता
र होऊन पुष्कळ देशस्थांस आशीर्वाद मिळाला·
एथें ख्रीस्ती धर्माची प्रवृत्ति होण्याविषयीं जे इच्छा
करितात ते ह्या देशावर उपकार करितात ·ते कों
ण्हास उपद्रव देतनाहींत आणि सर्वांसाठीं प्रार्थना
करितात व झटतात· ज्ञान व सरूपता यांची प्रवृ
त्ति व्हावी पापाचा ध्वंस व्हावा आणि विशेषें करून
आत्मे तारले जावे ह्मणून फार इच्छितात·

विशेष लिहिण्याचें आतां कारण राहिलें ना-
हीं सत्यतेवर प्रीति ठेऊन ह्या मोठ्या गोष्टी मागील
मी आपल्या मताप्रमाणें सांगितल्या · कीं देवानें वा
चणाराला आशीर्वाद द्यावा ह्मणून मी फार विनं
ती

ती करितों · जर मोरभट्टाचा व दुसरे कोणे एकाचा
उपद्रव झाला तरीं क्षमा मागतों· जर याजवर उत्त
र कोणी देईल तर मी आपल्या मताचें स्थापन क-
रायास सिद्ध आहें· पूर्तेपणीं शोध करायास मीं हिं
दुलोकांस सुचवितों · जे आपल्या आत्म्याची काळ
जी करितात त्यानीं विशेषें क[illegible] याचा शोध क
रावा· हा आतांच आत्म्याचा उद्धार होण्यास मुहू
र्त आहे··

यावत्स्वस्थमिदं देहं यावन्मृत्युश्च दूरतः
तावदात्महितं कुर्यात्प्राणांते किं करिष्यति॥१॥

जावत्काल हा देह स्वस्थ आहे आणि जों पर्यंत मृत्यु
दूर आहे तोंपर्यंत आत्म्याचें हित करावें कांकीं प्रा
ण गेल्यावर काय करिशील कांहीं करवत नाहीं·
ह्या देशांतील लोकांच्या हृदयांत ईश्वरानें प्रकाश क
रून त्यांस तारावें अशी प्रार्थना करून सही करितों·

जान उइल्सन्·

ख्रीस्ती उपाध्या·